गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काळे (संस्थापक) Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं : 0241-2993900

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
Since 1935
मौ. हरी बाकाजी देउगांवकर
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. १९४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शनिवार दि. २७.०७.२०२४ | अंक नं. १२६ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

आला रे आला राजपाल सेल आला..!
ज्वेलरीवर आकर्षक गिफ्ट
30-70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

अवैध व्यवसायाविरोधात कारवाईची मोहीम राबवा

पोलिस अधिक्षक राकेश ओला यांचे सर्व अधिकाऱ्यांना आदेश

नगर – पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसाय सुरू असल्यास त्वावर कारवाई करावी. त्यासाठी विशेष मोहीम राबवावी, असे आदेश जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच, स्थानिक गुन्हे शाखेलाही कारवाईची मोहीम सुरू करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. दरम्यान, ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसाय सुरू असल्याचे आढळून येईल, त्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही अधीक्षक ओला यांनी दिला आहे.

खासदार निलेश लंके यांच्या उपोषणानंतर पोलिस अधीक्षक ओला वशन मोडमध्ये आल्याचे चित्र आहे. उपोषण सुटताच दुसऱ्याच दिवशी (शुक्रवारी) अधीक्षक ओला यांच्या उपस्थितीत पोलिस अधीक्षक कार्यालयात मासिक गुन्हे आढावा बैठक घेण्यात आली. यात अधीक्षक ओला यांनी पोलिस ठाणेनिहाय कारवाईचा व गुन्ह्यांच्या प्रलंबित तपासाचा आढावा घेतला. जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कारवाईसाठी धडक मोहीम सुरू करावी, असे निर्देश पोलिस ठाण्यांना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात गेल्या सहा महिन्यात जुगारावर ७१० कारवाया झाल्या आहेत. अवैध दारू प्रकरणी २५२१, गांजा व इतर अंमली पदार्थांच्या विक्री, बाळगल्याप्रकरणी १७३ कारवाया करण्यात आल्या आहेत. तसेच, आर्म ॲक्ट अंतर्गत कट्टे बाळगल्याप्रकरणी ३१, तर इतर हत्यारे बाळगल्याप्रकरणी ११० कारवाया करण्यात आल्या आहेत. मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षात जास्त कारवाया केल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, चालू वर्षात १४ सराईत गुन्हेगारांविरोधात एमपीडीए अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. जिल्ह्यात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांच्या प्रमाणात तपास पूर्ण करून गुन्हे निकाली काढण्याचे प्रमाणही वाढले असल्याचे अधीक्षक ओला यांनी सांगितले.

तनिष्क शोरुम, झोपडी कॅन्टीन शेजारी, नगर-मनमाड रोड, अहमदनगर. दूरध्वनी : 8856805860 / 9373565017

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाळोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य मुंढेचा

email - navamaratha@gmail.com

स्वप्नी जे देखिले...

जीवनातील गूढतेचे दर्शन घडवणारे माध्यम म्हणजे मानवाला पडणारी स्वप्ने. देवादिदेव, संतमहंतांपासून आपणासारख्या सर्वसामान्यांची खूप विविधरंगी, ढंगी व विलक्षण असतात.

खरेतर प्रत्येक मनुष्य स्वप्ने पाहतो. रोजच्या झोपेत व दिवसाच्या, डोळ्यासमोरची जीवनध्येयाविषयी 'दिवा स्वप्ने!' स्वप्न मग ते युवकाचे प्रेयसीबद्दल, बेरोजगाराचे नोकरी, व्यापारविषयी, सामाजिक (खऱ्या) मनुष्याचे समाज सुधारण्याविषयी किंवा महिलांचे स्वतःच्या मुलं, पती वा कुटुंबाप्रती स्वप्न सगळ्यांना पडतात, त्याच्या पूर्ततेसाठी बरेचजण प्रयत्नही करतात.

ज्याला एक सहजसुंदर, मनभावन जीवन जगायचे किंवा मध्यदिव्यतेचे आकर्षण असेल त्यांनी सफल व्यक्तिमत्त्वांची स्वप्न व आत्मचरित्रे वाचली पाहिजे. निदान तुम्हाला

"मुसाफिर"-९८२२०२०६९१

ज्या क्षेत्राबद्दल किंवा स्वप्नाचा पाठलाग करायचा आहे त्या क्षेत्रातील वा संबंधातील स्वप्नपूर्तीत करणाऱ्यांचा अभ्यास करावा. स्वप्नांची दुनिया खूप अजीब व अनोखी असते. हजारो वर्षांपासूनचा मानवाचा हा स्वप्नमयी प्रवास निरनिराळ्या ढंगांमध्ये रंगांचा, ढंगांचा व आकाराचा आहे. ज्यांची स्वप्ने पूर्ण होतात त्यांच्या जीवन उद्यानात या ढगांतूनच रंगबिरंगी इंद्रधनुष्य उगवते, बहरते. काय म्हणता तुमच्याही जीवनात स्वप्नपूर्तीचे इंद्रधनुष्य चमकतेय? नशिबी आहात.

अहमदनगरच्या लोक अदालतीमध्ये ट्रॅफिक चलनाबाबत कुठल्याही तडजोडीचे आदेश नसल्याने लोकांमध्ये संभ्रम

नगर - केंद्र सरकारच्या धोरणानुसार ठिकठिकाणी सुट्टीच्या दिवशी लोक अदालत भरवण्याचा उद्देश असा आहे की, न्यायालयीन दंड किंवा आदेशामध्ये नमूद केलेल्या रकमेमध्ये काहीतरी समेट घडून आणून काही सूट देऊन संबंधित केस निकाली काढायची, परंतु आज नगरमध्ये लोक अदालतीमध्ये जमलेल्या ट्रॅफिक चलनाच्या दंडाची रक्कम भरणाऱ्या लोकांमध्ये बराच संभ्रम दिसून आला. औरंगाबाद आणि पुणे येथे आज लोक अदालतीमध्ये जवळजवळ ५० टक्के सूट दिली जात आहे, अशी बातमी सगळीकडे पसरलेली होती म्हणून लोकदेखील पटापट दंडाचे रक्कम भरून पुणे व औरंगाबाद येथे त्या केसमधून मुक्तता प्राप्त करीत आहेत, अशी माहिती तेथे जमलेल्या काही नागरिकांनी दिली. परंतु अहमदनगरमध्ये मात्र आज कुठलीही तडजोड केली जात नाही, तर मग लोक अदालतीचा काय फायदा? असा सवाल करण्यात येत आहे.

अहमदनगरच्या लोक अदालतीमध्ये प्रकरणाच्या तडजोडीसाठी आलेले लोक.

याबाबत सत्यता पडताळण्यासाठी पुणे व औरंगाबाद येथून लोक अदालतीमधे तडजोड झालेल्या काही केसेस चे विवरण जागरूक नागरिक मंचाने मागवले आहे, याबाबत अहमदनगर वाहतूक शाखेशी संपर्क केला असता त्यांनी आम्हाला तडजोडीचे कसलेही आदेश नाहीत, त्यामुळे चलनाच्या दंडामध्ये कुठलीही सूट दिली जाऊ शकत नाही, असे सांगितले त्यामुळे बरेच लोक नाराज होऊन दंड न भरता माघारी गेले. दोन-दोन, तीन-तीन हजार रुपये दंड झालेले लोक पाथर्डी, शेवगाव येथूनही दंडामध्ये काही तडजोड होईल, या आशेने आलेले होते, परंतु रकमेमध्ये तडजोड या लोक अदालतीच्या हेतूचा व शब्दाचा तिथे काहीच उपयोग होताना दिसला नाही.

याबाबत वाहतूक निरीक्षक शहर वाहतूक निरीक्षक पेंदाम यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार पुढच्या लोक अदालतीपूर्वी हे संभ्रम निर्माण करणारे जे मुद्दे आहेत, याबाबत योग्य तो खुलासा संबंधितांकडून होणे आवश्यक आहे, असे मंचचे अध्यक्ष सुहास मुळे यांनी म्हटले आहे.

त्यासाठी लवकरच प्रशासकीय न्यायव्यवस्था व वाहतूक पोलीस प्रशासन यांची मिटींग आयोजित केली जाईल. त्यामध्ये जागरूक नागरिक मंचातर्फे प्रतिनिधी म्हणून सुहास मुळे यांनी उपस्थित राहुन याचे स्पष्ट खुलासे घ्यावेत, असे सांगितले.

पावसाळ्यातील आपत्ती व नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात

आमदार संग्राम जगताप यांचे अहमदनगर महानगरपालिका आयुक्तांना पत्र

नगर - सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. नगर शहरामध्येही दररोज पाऊस होत आहे. शहरातील काही भागात पावसाचे पाणी साचून राहत आहे. याचा नागरिकांना त्रास होत आहे. सततच्या पावसामुळे साथीचे आजार बळावण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. नालेसफाई आणि साथीच्या आजारांबाबत यापूर्वीही वारंवार तत्कालीन आयुक्त यांना अवगत केलेले आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तातडीने उपाययोजना होणे आवश्यक आहेत. पाणी साचून राहत असलेल्या ठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, अशी मागणी आ. संग्राम जगताप यांनी महापालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

शहर व उपनगरात अंतर्गत काही रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांची देखभाल दुरुस्ती होणे आवश्यक आहे. ती तत्परीत करण्यात यावी. खड्डे भरुन सुरक्षित वाहतुक सुनिश्चित करण्यात यावी. जुनी व धोकादायक झाडे कोसळण्याची शक्यता असेल तर त्यांचा त्वरित उपाय केला जावा. संभाव्य आपत्तींसाठी एक आपत्ती व्यवस्थापन योजना तयार केली जावी. बचावकार्यासाठी आवश्यक उपलब्धता सुनिश्चित करण्यात यावी. नागरिकांना पावसाळ्यातील सुरक्षेच्या उपाययोजनांबद्दल जनजागृती केली जावी. राज्यात पुणे, मुंबईसह इतर ठिकाणी मुसळधार पाऊस सुरु आहे. नद्यांना पुर आले आहेत. पुणे, मुंबईतील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अहमदनगरमध्येही हवामान खात्याने पावसाचा इशारा दिला आहे. नगर शहरातुन सीना नदी जात आहे. सीना नदीला पुर येऊन नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याच्या घटना यापुर्वीही घडलेल्या आहेत. यातुन नागरिकांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. नागरिकांचे नुकसान होऊ नये. नागरिकांच्या घरात पाणी शिरु नये यासाठी महापालिका प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी व उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात. नागरकांना पुराच्या पाण्याचा व साथीच्या आजारांचा त्रास होणार नही यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात यावी.

या मागण्यांचा गांभीर्याने निर्णय घेऊन त्वरित कार्यवाही करावी असे आ. जगताप यांनी या पत्रात म्हटले आहे.

'साई मिडास'चे बांधकाम थांबविण्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे महानगरपालिकेला आदेश

नगर - येथील साई मिडास (ऑरम बिसनेस हब ॲण्ड ओ आर ओ रेसिडेन्सेस), अहमदनगर या इमारतीवर कारवाई करण्याबाबत दिप चव्हाण यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर इमारतीचे बांधकाम थांबविण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना दिले आहेत.

या संदर्भात प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांनी २२/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये साई मिडास (ऑरम बिसनेस हब ॲण्ड ओ आर ओ रेसिडेन्सेस) प्लॉट नं. (१४+४४/१/१) व (४४+४४+१/१)२ फायनल प्लॉट नं.४४ (४४/१, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर) यांना मंडळाकडून संमतीपत्र व पर्यावरण विभागाचे अनुमतीपत्र घेतले नसल्याने सदरील इमारतीचे बांधकाम थांबविणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने साई मिडास मंडळाच्या निर्देशानुसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत अवगत करावे असे मंडळाच्या उपप्रादेशिक अधिकाऱ्यांनी मनपाला पाठविलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या द्वारे जगभरात १४० देशात शिकविल्या जाणाऱ्या भारताच्या प्राचीन राजयोगाची पुस्तके अण्णा हजारे यांना ध्यानपाठाच्या प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांनी राळेगण सिद्धी येथे भेट देनी व संस्थेचे आंतरराष्ट्रीय मुख्यालय माऊंट आबू भेटीचे निमंत्रण दिले.

नगरच्या कृष्णराज टेमकर याची 'महाराष्ट्र फुटबॉल संघा'त निवड

नगर - अहमदनगर डिस्ट्रिक्ट फुटबॉल असोसिएशनच्या वतीने मुंबई येथे निवड चाचणीस पाठविलेला शहरातील १५ वर्षा आतील खेळाडू कृष्णराज गुरुदत्त टेमकर याची महाराष्ट्र फुटबॉल संघात निवड झाली आहे. टेमकर याची झालेली निवड जिल्ह्याच्या दृष्टीने अभिमानास्पद गोष्ट असून, तो पुढील स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

टेमकर याची झालेल्या निवडीबद्दल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदीया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज बाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, उपाध्यक्ष जोगासिंग मिनहास, उपाध्यक्ष अमरजितसिंग साही, सचिव रॉनप फर्नांडीस, सहसचिव प्रदीपकुमार जाधव, सहसचिव व्हिक्टर जोसेफ, खजिनदार राणा परमार, सहखजिनदार रणबीरसिंग परमार, कार्यकारिणी सदस्य जोएब खान, राजेंद्र पाटोळे, सादिक सय्यद, प्रशिक्षक जोव्हिअर स्वामी, कार्यकारिणी सदस्या पल्लवी सैंदाणे आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

कृष्णराज हा आठरे पाटील पब्लिक स्कूलचा विद्यार्थी असून, त्याला शाळेचे क्रीडा शिक्षक संदीप दरंदले यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

नगरमध्ये धारदार तलवार बाळगणाऱ्याला पकडले

नगर - नगर शहरातील खिस्त गल्ली परिसरात संगम चौक येथे बेकायदेशीरपणे धारदार तलवार बाळगणाऱ्या आरोपीला कोतवाली पोलिसांनी पकडले आहे. त्याच्या ताब्यातून एक तलवार जप्त करण्यात आली आहे. गुरुवारी (दि.२५) रात्री १९.१५ वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.कोतवालीचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांना गोपनीय माहिती मिळाली की इसम नामे जॉन कासिनो परेरा (रा. बंगाल चौकी, नगर) याचे कडे एक लोखंडी धारदार तलवार असून तो खिस्त गल्ली परिसरात संगम चौक येथे आहे. ही माहिती मिळताच त्याची एक पथक कारवाई साठी पाठवले. या पथकाने जॉन परेरा याला पकडून त्याची झडती घेतली असता त्याचेजवळ एक धारदार लोखंडी तलवार मिळून आली. सदर तलवार त्याचेकडून जप्त करुन त्याच्या विरुद्ध पो.कॉ.लोळगे यांच्या फिर्यादी वरुन कोतवाली पोलिस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घरासमोरील पाण्याच्या हौदात पडून बालिकेचा मृत्यू

नगर - घरासमोरील अंगणात असलेल्या हौदात पडून लहाणीचे पाण्यात बुडून एक ५ वर्षीय बालिकेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना निंबळक (ता.नगर) परिसरात शुक्रवारी (दि.२६) रात्री घडली. माही केतन गजर (वय ५, रा. निंबळक,ता.नगर) असे मयत बालिकेचे नाव आहे. माही ही घरासमोरील अंगणात खेळत असताना अंगणातील पाण्याच्या हौदात पडली. हौदात पाणी असल्याने ती पाण्यात बुडून बेशुद्ध पडल्याचे तिच्या कुटुंबियांच्या निदर्शनास आले. त्यानंतर तिचे नातेवाईक अतुल गजर यांनी खाजगी वाहनाने शुक्री ९.३० च्या सुमारास उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात नेले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.पोले यांनी लिला उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतची माहिती दवाखाना ड्युटीवर असलेले तोफखाना पोलिस ठाण्यातील स.फौ. जी. जी. गोडे यांनी एमआयडीसी पोलिसांना कळविली. या माहिती वरुन पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

आष्टी-नगर-पुणे-मुंबई रेल्वे शटल एक्स्प्रेस सुरु करा

विक्रम राठोड यांची रेल्वेमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर - बीड, आष्टी, जामखेड आणि नगरहून पुण्याला दिवसाला ५ लाखाहून अधिक लोक ये-जा करीत असतात. नगर-पुणे रोडवरील सूप टोल नाक्यावर याची नोंद आहे. तसेच नगर पुणे मार्गावर दररोज २००० पेक्षा जास्त एस टी आणि खाजगी ट्रॅव्हल्सची वाहतूक होते. त्यामुळे आष्टी नगर-दौंड क्राडलाईन - पुणे - मुंबई अशी थेट रेल्वे सुरू झाल्यास सर्वांची सोय तर होईलच, पण विकासास नवा आयाम मिळेल. ही रेल्वे सुरु करण्याबरोबरच मनमाड नगर पुणे रेल्वे मार्गावर ज्या एक्स्प्रेस आणि पेसेंजर रेल्वे गाडया धावतात, त्यांना नगर स्थानकातून पुण्यासाठी तिकीट मिळावे, यामुळे लाखो लोकांचे नशीब बदलेल. आणि त्याच्या प्रगतीत भर पडेल, असे युवा सेनेचे राज्य सहसचिव विक्रम राठोड यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना खा. निलेश लंके यांच्यामार्फत पाठविलेल्या निवेदनाद्वारे म्हटले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, बीड, परळी, उस्मानाबादसह मराठवाड्याचे भाग्य उजळविण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने महतप्रयासाने आष्टी नगर रेल्वे सुरु केली. मात्र या रेल्वेला मिळालेला अत्यल्प प्रतिसाद पाहता या रेल्वेचा फ्लॉप शो झाला आहे. प्रत्यक्षात ही रेल्वे आष्टी ते नगर ते दौंड कॉडलाईन ते पुणे आणि पुढे मुंबई अशी धावायला हवी होती. मात्र रेल्वे खात्याचे अधिकारी आपणास खोटी माहिती देत असल्याकारणाने आणि नगरस्थित रेल्वे कर्मचाऱ्याचे ड्युटीचे तास पूर्ण व्हावेत आणि त्यांना परत नगर मुक्कामी येता यावे, या माफक उद्देशाने रेल्वे अधिकाऱ्यांनी ही रेल्वे सकाळी नगरहून आष्टीला सोडली आणि ती दुपारी २ पर्यंत परत नगरला आणली. आता याही दुसरी फेरी दुपारी परत नगरहून आष्टीकडे सोडण्यात येणार आहे आणि संबंधित अधिकारी आष्टीहून निघून ती नगरला आणण्यात येणार आहे. पण या रेल्वेला प्रवाशांचा अतिशय अत्यल्प प्रतिसाद मिळाला आहे,

नगर - आष्टी रेल्वेएक्सी आष्टी - नगर -पुणे - मुंबई अशी रेल्वे शटल एक्सप्रेस सुरु करा, या मागणीचे निवेदन खा. निलेश लंके यांना देताना विक्रम राठोड.

तरीदखील या फ्लॉप शो चा रिपीट टेलिकास्ट करण्याचा घाट रेल्वे खाते का घालत आहे याचा उलगडा होत नाही. ही रेल्वे चालविण्यासाठी दररोज ८० हजार रुपयांचे डिझेल लागते पण तिकिटे फक्त १०० ते १५० विकली जातात. मग हा द्राविडी प्राणायाम कशासाठी ? ही रेल्वे जर आष्टी नगर-दौंड - पुणे - मुंबई अशी सुरु झाली आणि ती जर सायंकाळी आष्टीहून निघाली आणि पहाटे मुंबईत पोहोचली तर त्याला प्रतिसाद मिळेल. हजारो विद्यार्थी आणि कामगार वर्ग यांना दररोज जास्त वेळ, पैसा आणि परिश्रम खर्च करून रस्ते मार्गाने खस्ता खात पुणे-मुंबईला जावे लागते.

नगरमधील शेकडो विद्यार्थी शिक्षणासाठी पुण्यात राहतात. त्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. थेट रेल्वे सुरू झाल्यास दीड तासात ते पुण्याला पोहोचू शकतील आणि आपल्या घरी राहुनच शिक्षणासाठी ये-जा करू शकतील. रेल्वेअभावी प्रवाशांच्या वेळ व खिशाला चाट बसत आहे. हा त्रास वाचविण्यासाठी थेट रेल्वे हाच एक पर्याय आहे. नगर पुणे रेल्वे मार्गावर कॉड लाईन टाकण्यात आल्याने आणि या मार्गाचे विद्युतीकरण पूर्ण झाल्यामुळे नगर-पुणे हा रेल्वे प्रवास अवघ्या अडीच तासावर आला आहे. उलट वाढत्या वाहतुकीच्या कोंडीमुळे नगर-पुणे हा रस्ता मार्गे प्रवास ४ ते साडेचार तासांचा झाला आहे. हा एक वेगळा मनस्तापच आहे.

आष्टी नगर-दौंड क्राडलाईन - पुणे - मुंबई अशी रेल्वे सुरू करण्यात आली तर रेल्वे व प्रवासी अशा दोघांच्याही दृष्टीने फायद्याचे ठरेल. मराठवाड्यातील प्रवासीही नगरपर्यंत बसने येऊन थेट्पुन रेल्वेने लवकर पुणे मुंबईला जाऊ शकतील. त्यामुळे लवकरात लवकर आष्टी नगर-दौंड क्राडलाईन - पुणे - मुंबई रेल्वे चालू करावी, अशी मागणी राठोड यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

झुंबरबाई लोखंडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - सिद्धार्थनगर येथील रहिवासी झुंबरबाई रंगनाथ लोखंडे (वय ७८) यांचे १९ जुलैला अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात विलास व संजय लोखंडे ही २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

शांताबाई देवळालीकर यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - पानसरे गल्ली येथील रहिवासी शांताबाई दिगंबर देवळालीकर (वय ९३) यांचे २६ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे, पंतू, खापर पंतू असा परिवार आहे. प्रकाश व किरण देवळालीकर यांच्या त्या मातोश्री होत.

बिशनदास वाधवाणी यांचे अल्प आजाराने निधन

नगर - तारकपूर येथील रहिवासी बिशनदास मनोहरलाल वाधवानी यांचे २५ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ भाऊ, ३ बहिणी, भाऊजया, ३ मुले, नातवंडे असा परिवार आहे.

भरदिवसा घरफोडी करत दागिन्यांची चोरी

नगर - शेतात काम करत असलेल्या शेतकऱ्याचे घर चोरट्यांनी भरदिवसा फोडत सोन्याचे दागिने व मोबाईल असा ५० हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील देहरे गावच्या शिवारात घडली.

याबाबत संजय नामदेव काळे (रा. घोगरदरा, देहरे, ता.नगर) यांनी शुक्रवारी (दि.२६) सायंकाळी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चोरीची ही घटना बुधवारी (दि.२४) दुपारी ३.३० ते ४ वाजेच्या सुमारास देहरे शिवारात असलेल्या घोगरदरा वस्ती वर घडली.

फिर्यादी काळे व त्यांचे कुटुंबीय घराला कुलूप लावून शेतात गवत काढण्यासाठी गेलेले होते. त्यावेळी एका बजाज कंपनीच्या बॉक्सर मोटारसायकल वर तिघे जण त्यांच्या वस्तीवर आले व त्यांनी घरातून सोन्याचे दागिने आणि मोबाईल असा ५० हजारांचा ऐवज चोरून नेला असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरुन पोलिसांनी बी.एन.एस.२०२३ चे कलम ३३१ (३), ३०५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

कौटुंबिक व कामगार न्यायालयात झालेल्या लोकन्यायालयात तडजोडीने प्रकरणे निकाली

प्रकरणांचा निपटारा होण्यासाठी लोकन्यायालय काळाची गरज : न्यायाधीश संगीता ना. भालेराव

नगर - येथील कौटुंबिक व कामगार न्यायालयात शनिवारी (दि.२७ जुलै) लोकन्यायालयात अनेक प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आले. या लोक न्यायालयामध्ये न्यायालयाचे न्यायाधीश श्रीमती संगीता ना. भालेराव, न्यायाधीश मनिषा द. चरोटे-हेपे, न्यायाधीश बी.एस. लखोटे, अभिजीत देशमुख, कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे, उपाध्यक्ष ॲड. सुरेश लगड, सचिव ॲड. राजेश कावरे, प्रभारी प्रबंधक सुधीर काकडे, धीरज नारखेडे, शेखर मेहेत्रे, अविनाश सूर्यवंशी, रंगनाथ गवळी, गजानन देशमुख, मुकरम शेख, कविता बारेला, अशोक राहिंज, संतोष अळ्कुटे, पो.कॉ. भगत मॅडम, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. अशोक पाटील, ॲड. कल्याण पागर, ॲड. मनीषा केळगंद्रे, ॲड. अशोक गुंड, ॲड. दिपक चंगेडे, ॲड. बी.आर. शेलार, ॲड. जयेश आमले आदी उपस्थित होते.

कौटुंबिक व कामगार न्यायालयात शनिवारी (दि.२७ जुलै) लोकन्यायालयात अनेक प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आले. या लोक न्यायालयामध्ये न्यायालयाचे न्यायाधीश श्रीमती संगीता ना. भालेराव, न्यायाधीश मनिषा द. चरोटे-हेपे, न्यायाधीश बी.एस. लखोटे, अभिजीत देशमुख, कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे, उपाध्यक्ष ॲड. सुरेश लगड, सचिव ॲड. राजेश कावरे, प्रभारी प्रबंधक सुधीर काकडे, धीरज नारखेडे, शेखर मेहेत्रे, अविनाश सूर्यवंशी, रंगनाथ गवळी, गजानन देशमुख, मुकरम शेख, कविता बारेला, अशोक राहिंज, संतोष अळ्कुटे, पो.कॉ. भगत मॅडम, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. अशोक पाटील, ॲड. कल्याण पागर, ॲड. मनीषा केळगंद्रे, ॲड. अशोक गुंड, ॲड. दिपक चंगेडे, ॲड. बी.आर. शेलार, ॲड. जयेश आमले आदी

अशोक पाटील, ॲड. कल्याण पागर, ॲड. मनीषा केळगंद्रे, ॲड. अशोक गुंड, ॲड. दिपक चंगेडे, ॲड. बी.आर. शेलार, ॲड. जयेश आमले आदी उपस्थित होते.

दैनंदिन न्यायालया समोर वाढती प्रकरणे व एवढ्या मोठ्या प्रकरणांचा निपटारा होण्यासाठी लोकन्यायालय काळाची गरज बनली आहे. लोकन्यायालयात समोपचाराने प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर कौटुंबिक न्यायालयात प्रकरणे देखील समोपचाराने सोडविण्यात आली.

संगीता ना. भालेराव यांनी व्यक्त केली. लोकन्यायालयात औद्योगिक न्यायालयातील २७ पैकी २६ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर कौटुंबिक न्यायालयातील प्रकरणे देखील समोपचाराने सोडविण्यात आली.

गृहिणी

आरोग्य

दूध पिणे आरोग्यदायी

* दुधामध्ये भरपूर प्रमाणात विटामिन्स व प्रोटीन असते. तसेच रात्री झोपताना देखील दूध प्यायले पाहिजे. झोपण्याअगोदर एक तास अगोदर नियमित दूध प्यायले पाहिजे.

* योगासनांचा फायदा किरकोळ सर्दी-खोकला, पोटाचे आजार दूर ठेवण्यास नक्कीच होतो.

वाढत्या वयाच्या मुलांनाही योगसरावाचा खूप उपयोग होतो. त्यांच्या शरीराची आणि मनाची योग्य वाढ होण्यास मदत मिळते.

पाककला

चना चाट

साहित्य – भिजवलेले हरबरे, उकडलेला बटाटा एक, कांदा बारीक चिरून, टोमॅटो बारीक चिरून, कोथिंबीर बारीक चिरून, शेव दोन ते चार चमचे, लिंबाचा रस किंवा बारीक चिरलेली कैरी, चाट मसाला, लाल तिखट

कृती – भिजवलेले चणे दोन शिट्ट्या घेऊन उकडून घ्या. त्यातले पाणी काढून चणे एका मोठ्या बाऊलमध्ये काढून घ्या. आता त्यात उकडून हाताने मॅश केलेला बटाटा, चिरलेला कांदा, टोमॅटो घाला.

आता त्यात लाल तिखट, मीठ, चाट मसाला घाला. शेवटी लिंबू पिळून किंवा कैरीचे तुकडे टाका. सर्व्ह करताना ऐन वेळी कोथिंबीर आणि शेव घालून सर्व्ह करा चणा चाट यात कोणतेही तेल वापरण्याची गरज नाही.

सौंदर्य

चेहऱ्यावरील अनावश्यक केस घालविण्यासाठी

दोन चमचे साखर, दोन चमचे लिंबाचा रस आणि एक चमचा मध हे सर्व एकत्र मिश्रण तयार करून ते थोडे गरम करून घ्यावे. हे मिश्रण थंड झाल्यावर जेथे चेहऱ्यावर अनावश्यक केस आहेत तेथे थोडा मैदा वरील मिश्रण लावावे. त्यानंतर वैक्सिंग स्ट्रिप किंवा कापडाच्या साहाय्याने अनावश्यक केस दूर करा. आठवड्यातून एक ते दोन वेळा हा उपाय आपण करू शकता.

सल्ला

वारंवार एकच बूट वापरू नये. आलटून पालटून शुज, बुट्स व चप्पल वापरावे. आपण वापरलेले हातमोजे व पायमोजे नियमित स्वच्छ धुवावे.

वास्तू

* आपल्याकडे बऱ्याच जणांच्या घरात स्वयंपाकघरातच देव्हारा असतो. पण वास्तुशास्त्र नेमकं याच्या उलट सांगतं. वास्तूनुसार, स्वयंपाकघरामध्ये किंवा जवळ कधीही देव्हारा असू नये. यामुळे घरातील लोकांच्या रागात वाढ होते. तसंच आरोग्यनिगडीत समस्याही वाढतात. त्यामुळे शक्य असल्यास देव्हारा तुम्ही तुमच्या स्वयंपाकघरापासून दूर ठेवा आणि घराच्या हॉलमध्ये अथवा अन्य ठिकाणी तुम्ही हा देव्हारा करून घ्या.

* आपल्या घराच्या मुख्य दरवाज्याबाहेर हत्तीच्या जोडीची मूर्ती ठेवा आणि घराबाहेर पडताना ती बघून निघा. यामुळे तुमचं गुडलक नेहमी कायम राहील आणि घर सुरक्षित राहील. तसंच कोणत्याही प्रकारची नकारात्मक ऊर्जा तुमच्या घरात प्रवेश करणार नाही.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

रविवार, दि. २८ जुलै २०२४

कालाष्टमी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, अश्विनी ११।४८, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

राशिभविष्य

मेष : आजचा दिवस आपल्या कार्य-योजनेंसाठी आणि सहकाऱ्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल.

वृषभ : बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते. तसे आपले सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील.

मिथुन : आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील. हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो.

कर्क : आपल्या आर्थिक मुद्द्यांनुसार एखाद्याचे मन वळविणे कठिण होईल. आर्थिक बाबतीत उन्नती होईल.

सिंह : मुलांसाठी आणि पत्नीसाठी वेळ द्यावा. सर्जनशील कार्यांमध्ये शिस्त असल्यास उन्नतीचा मार्ग मोकळा होईल.

कन्या : आनंदाची बातमी मिळेल. मानसन्मानात वाढ होईल. व्यापार-व्यवसायात उत्तम स्थिती राहील.

तूळ : महत्वाची बातमी मिळाल्याने आनंदित राहाल. पत्नी व मुले यांचा आनंददायी सहवास मिळेल.

वृश्चिक : आपल्या कामांमध्ये मित्रांचा सहयोग मिळेल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील.

धनु : घरात राहून साफसफाई करायची असल्यास काही कारणांमुळे विघ्न येतील. अधिकार क्षेत्रात वाढ होईल.

मकर : आजच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्या.

कुंभ : आजच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्या.

मीन : आजचा दिवस विधायक कामासाठी चांगला आहे. आपण कुणापासून प्रेरीत व्हाल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

शब्दगंध क्र. ६९७६

सौ.शैलजा कुलकर्णी

शब्दगंध क्र. ६९७५ चे उत्तर



आडवे शब्द :- १) संभव नसलेले; अशक्य ४) एक मराठी आडनाव ७) लहान अपुरे धोतर ८) वाईट: चांगले नसलेले ९) विष: जहर, सापाचे विष ११) मडके भाजण्याची कुंभाराची भट्टी १२) धापाड्या १४) कोणत्याही प्राण्यातील स्त्री जात १५) तशा प्रकारचा, तसला १६) अधर्म, पातक १९) निरर्थक चक्कर किंवा फेरी २१) संशय: शक; संदेह २३) आपत्ती, संकट; अरिष्ट २४) गायनात निरनिराळ्या सुरांनी केलेला रागाचा विस्तार २५) इंग्रजी वर्षाचा पाचवा महिना २६) लाल तोंडाचा व शेपटी असलेला एक प्राणी

उभे शब्द :- १) शारीरिक व्यंग असलेला, पंगू: दिव्यांग २) बाहेर सार्वजनिक ठिकाणी लोकांना फिरण्यास पोलिसांकडून करण्यात आलेली मनाई ३) ज्यावर लेखणीने लिहिले जाते ते कागदांचे टाचण, चोपडी ४) एक चर्मवाद्य; मृदंग; पणवानक (५) वेगाने वाहणारी हवा; पवन ६) दूध घट्ट आटवून बनविलेले एक पक्वान्न; बासुंदी १०) सर, हार, माळ (फटाक्यांची) ११) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव १३) वाईट सवय, खोड १४) माणुसकी १६) लहान मुलाचा मुका १७) जलदी, भरभर १८) उष्णतेमुळे त्वचेतून बाहेर पडणारे पाणी २०) भूषण, अलंकार २२) कमी दर्जाचे, हलक्या स्तराचे

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ मुलांचे विश्व ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : एखाद्याला हरवणे सोपे आहे परंतु एखाद्याला जिंकणे अवघड

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

रक्तात साखर असण्याचे काय दुष्परिणाम होतात?

तुम्ही गुलाबजाम तर नक्कीच पहिला असेल. तो आपण साखरेच्या पाकात ठेवतो. साखरेचा पाक हा जाड आणि चिकट असतो. पाण्यात जेवढी जास्त साखर मिसळाल तेवढे पाणी जाड होते त्याची घनता वाढते. रक्त सुधा पाण्यासारखेच आहे.

रक्तातील साखरेचे प्रमाण वाढले की रक्त सुद्धा जाड होते त्याची विस्कोसिटी वाढते. आता हे जाड रक्त विस्कोसिटी वाढल्याने वाहणे कमी होते, गुठळ्या बनण्याचे चान्स वाढतो. त्यामुळे शरीरातील सर्वात लहान रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉक व्हायचे चान्स वाढतात. म्हणुनच मधुमेह असलेल्या रुग्णांना हार्ट ॲटॅक किंवा लकवा (स्ट्रोक / पॅरेलिसिस) झटका यायचे चान्स जास्त असतात.

मूर्खाला उपदेश केला तर

एकदा हिमालयाच्या भागात एक वानर पावसात सचैल भिजल्याने थंडीने कुडकुडत एका झाडाखाली बसला होता. त्याच झाडावर एका घरट्यात एक पक्षी राहात होता. कुडकुडणाऱ्या वानराला बघून त्याने म्हटले, 'अरे, आम्ही केवळ चोचीने घरटे बांधतो. तुला तर माणसासारखे हात-पाय आहेत. डोके आहे. असे असताना राहायला घरकुल का बांधत नाही तू? बांधले असतेस तर उघड्यावर अशी कुडकुडत बसण्याची पाळी आली नसती तुझ्यावर.'

'माणसासारखे हात-पाय आहेत मला, पण..' वानर कुरकुरला, पण माणसासारखी कामगिरी आम्हाला कुठली जमायला? आमचे डोके तेवढे नाही काम करत.'

'त्याचे काय आहे..' पक्षी बोलला, 'ज्याचे मन चंचल असते, जो दुसऱ्याच्या कुचेष्टा करण्यात वेळ दवडतो, त्याच्या हातून विधायक स्वरूपाचे काम होत नाही. यासाठीच दुसऱ्याला त्रास देण्याची प्रवृत्ती तू सोडून द्यायला हवीस. मग जिद्दीने, चिकाटीने स्वतःच्या निवार्यासाठी घरकुल बांधता येईल तुला.'

उपदेश ऐकायची सवय नसलेल्या वानराला आला वैताग. तो चिडून, दात चिचकत बोलला, 'घरट्यात बसून मरे उपदेश करायला काय जाते तुझे? तू समजतोस कोण स्वतःला? थांब, माझा इंगाच दाखवतो तुला.'

आणि झरझर झाडावर चढून त्या वानराने पक्ष्याचे घरटेच विस्कटून टाकले. दुष्ट स्वभावाच्या मूर्खाला आपण उपदेश करीत बसलो, म्हणून हा प्रसंग आपल्यावर ओढवला. हे तो पक्षी जाणून चुकला आणि 'स्वतःचं घर करवत नाही अन् दुसयराने बनवलेले बघवत नाही,' असे मनाशी म्हणत तो पक्षी दूर उडून गेला.

तात्पर्य – मुर्खाला उपदेश केला तर संकट आपल्यावरच ओढवते.

जीवन चक्र

अनेक व्यक्तींची प्रवृत्ती असते की ते अर्धा भरलेल्या पेल्यास अर्धा रिकाम्या रूपात बघतात, अर्ध्या भरलेल्या रूपात बघत नाही. एखाद्या परिस्थितीला जेव्हा आम्ही बघतो तेव्हा सर्व साधारण प्रवृत्ती त्या परिस्थितीतील चांगली बाजू बघण्याऐवजी त्याची वाईट बाजू बघण्याची असते. साहित्यामध्ये एक पात्र, 'रोबिन्सन क्रुसो'' ह्यांच्याशी निगडीत एक बोधप्रद कथा आहे. तो एका वाळवंटाच्या द्विपावर आडकला होता. आणि तेथे त्याला जिवंत राहण्यासाठी मार्ग शोधायचा होता. जेव्हा तो द्विपावर होता तेव्हा त्यांनी दोन याद्या बनविल्या. एकास तो सकारात्मक म्हणत आणि दुसऱ्यास नकारात्मक म्हणत. त्यांनी आपल्या अवस्थेबद्दल विचार केला आणि त्याच्या बाबतीत जे काही होत होते त्यास पहिल्या किंवा दुसऱ्या यादीत लिहायला लागला. **(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

शुद्ध जीवन जीने के मंत्र

जूस थैरेपी में सब्जियों एवं फलों का रस मिलाकर लेने से कोई दुष्प्रभाव नहीं है परंतु रस एवं जूस को मिलाते समय सावधानी बरतें कि किसे किसके साथ लेना है। कोई बीमारी आ जाने पर कमजोरी बढ़ जाती है, जिसमें भोजन आसानी से खाया या पचाया नहीं जा सकता है। ऐसे समय हम जूस या रस के उपयोग से शारीरिक व मानसिक कमजोरी को दूर कर सकते हैं। क्योंकि रस एवं जूस से तमाम पौष्टिक तत्व आसानी से मिल जाते हैं। कोई रस या जूस हमें धीरे-धीरे मुँह में घुमा घुमाकर पीना चाहिए। यहाँ तक कि पानी भी धीरे-धीरे ही पीना चाहिए।

इस प्रकार पीने से पर्याप्त राल मिल जाती है, तथा हमारे मुँह में पैदा होने वाली गर्मी भी शांत हो जाती है और ये ठंडक हमारे पेट तक पहुँचती है। ऐसा करने से भोजन में रक्त अधिक बनने की क्षमता पैदा हो जाती है तथा रक्त संचार भी ठीक से होता है। हमें कौनसा फल सही रहेगा या कौनसी सब्जी, वही रस या सब्जी लें। ये रस तथा जूस रोगों के निवारण के साथ-साथ रोगों से बचाव करके शरीर को शक्तिशाली बनाता है। जब तक अधिक आवश्यक न हो फल या सब्जियों का रस अलग-अलग ही पीएं।

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

''तुम्ही फक्त माझ्यासाठीच मसाला पान घेतलंत!...
आणि स्वतःसाठी का बरं नाही घेतलंत?''

बायकोने नवऱ्याला विचारले.

''मी पान तोंडात नसलं तरी गप्प राहू शकतो.''

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

मी जे फळ तुला दिले आहे
ते तू स्विकारलेस
हेच खरे माझे फळ आहे
मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर
मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,
पिंगार मो. ९४०३७३४२८१

साहित्य सहवास - 'हर एक की अपनी कहानी होती है...'

एकदा एका व्यक्तीने ठरवलं की आज दिवसभर अनेक ठिकाणी जायचं. एका मित्राच्या घरी गेला. मित्राच्या मुलाला नोकरी लागल्याच्या आनंदाप्रित्यर्थ त्याला पेढा मिळाला. त्याने, मुलाचं अभिनंदन केलं. मित्र म्हणाला 'आज रात्री आपण हॉटेलमध्ये जेवायला जाऊ.' ही व्यक्ती होकार देऊन निघाली. एका नातेनाईकाच्या घरी आली. त्याच्या घरी आला तो आजारी आहे. त्याची पत्नी त्याला औषधं देते आहे. नेमकं काय झालं? म्हणून विचारलं तर मित्राची पत्नी म्हणाली की फक्त खात रहायचं एवढंच ह्या माणसाला कळलं. किती, काय, कधी आणि का खायचं ह्याचा विचारच करत नाही हा म नूस. मग ह्या व्यक्तीने त्याला व्यवस्थित समजावलं. ही व्यक्ती निघाली. एका मंदिरात आली. मनापासून प्रार्थना करून दर्शन घेतलं. मंदिराबाहेर आला. एक भिकारी म्हणाला, 'साहेब, दोन रुपये द्या गरिबाला.' ह्या व्यक्तीने दहाची नोट त्याला दिली. भिकाऱ्याने भरभरुन आशिर्वाद दिला. ही व्यक्ती मंदिराच्या पायरीवर बसली. पायरीजवळच्या झाडाखाली एक मुलगी रडत असलेली दिसली. त्या मुलीशेजारची बहुदा तिची आई असावी. मुलगी म्हणाली, मावशी, माझ्या सासरची माणसं खूप चांगली आहेत. हे माझे आनंदाश्रू आहेत. सासु, सासरा मला खूप जपतात, जीव लावतात. मावशी म्हणाली, असं सासर मि ळ्यला भाग्य लागतं. आणखीही चांगलं बोलणं ह्या व्यक्तिला ऐकु आलं. ही व्यक्ती तेथुन निघाली. एका परिचिताची रस्त्यातच भेट झाली. दोघांनीही जवळच्याच स्टॉलवर चहा घेतला. परिचित म्हणाला, आपला काळ खूपच चांगला गेला पण आता मुला, मुलीच्या भविष्यात नेमकं काय वाढवुन ठेवलंय माहिती नाही. मुलं, मुली शिकल्यात पण नोकरी नाही. बेरोजगारी वाढते आहे. ह्या काळजीने मी अस्वस्थ आहे. म्हणून मग अनेक महाविद्यालयांत जाऊन मुला, मुलींनी नोकरीच्या मागे न लागता, एखादा व्यवसाय करावा म्हणून मी मार्गदर्शन करतो आहे. ही व्यक्ती म्हणाली, तू खूपच चांगलं कार्य करतो आहेस. दोघांनीही चहा घेतला. दोघेही एकमेकांच्या विरुध्द दिशेला गेले. एक ठिकाणी काही तरुण मुलं वृक्षारोपण करतांना ह्या व्यक्तिला दिसली. ही व्यक्ती थांबली. काही मिनिटांतच त्या भागातले पुढारी असलेली व्यक्ती आली. तिने वृक्षारोपणबद्दल तरुण मुलांसमोर भाषण दिलं. स्वतःच्या हस्ते एक वृक्ष लावुन निघून गेले. एक तरुण म्हणाला, बरं झालं साहेबांनी थोडक्यात आटोपतं घेतलं. त्या तरुण मुलांनी ह्या व्यक्तिच्याही हस्ते एक वृक्ष लावला. ही व्यक्ती म्हणाली, झाडं लावताहात, हे खूपच चांगलं कार्य तुम्ही तरुण मुलं करता आहात. झाडं मायेनं जगवा. हे खरं वृक्षारोपण आहे. मुलांना मनापासून ही वाक्यं आवडली. एक तरुण म्हणाला, आम्ही ही झाडं नक्कीच जगवणार आहोत.

ही व्यक्ती घरी आली. अत्यंत शांतपणे बसली. मनात म्हणाली, खरंच हर एककी अपनी-अपनी कहानी होती है। प्रत्येकाच्या कहानीत आपण असुच असं नाही. ज्याचे – त्याचे प्रश्न ज्याला, त्यालाच सोडवायचे आहेत पण हे प्रश्न सोडवतांना इतरांचाही विचार करणं महत्वाचंच आहे. आपण त्याचं दुःख हलकं करण्याचा प्रयत्न नक्कीच करु शकतो. नव्हे केलाच पाहिजे. एखादी व्यक्ती अथवा व्यक्ती समुह चांगलं कार्य करत असेल तर चार शब्दांनी त्यांना प्रोत्साहन दिलं पाहिजे. अगदी पूर्वीपासून सासु म्हंटलं की सासुरवास हेच समीकरण आहे पण त्या मुलीच्या सासुसासरेही सासु अर्थात आई होण्याचा प्रयत्न केला तर त्या सुनेची कहानी खुपच चांगली असेल. ज्याचं त्याचं दरसोजचं जगणं ज्याच्या-त्याच्या परिने जगते आहे. एखाद्याच्या जगण्याची कहानी दुःखाने भरलेली असते, तर दुसऱ्या एखाद्याच्या जगण्याची कहानी आनंदाने भरलेली असते. प्रत्येकाची कहानी ही त्याच्याजवळ स्वतःचं घर आहे का ? त्याचं लग्न झालं आहे का ? त्याला मुलं आहेत का ? त्याला आई, वडिल, भाऊ, बहिण आहेत का ? तो नोकरी करतो की व्यवसाय करतो ? त्याचं उत्पन्न किती आहे ? तो किती खर्च करतो ? इतरांच्या भल्यासाठी वेळ, परिश्रम, पैसा देतो का ? त्याचं ध्येय काय आहे ? त्याची आवड-निवड, छंद काय आहेत? त्याचा स्वभाव कसा आहे ? स्वतः होऊन समाजासाठी तो काम करतो ? रिकाम्या वेळेचा तो काय उपयोग करतो ? कोणत्या गोष्टी, कृती, विचार आवडत नाहीत? मित्राच मलं झालं तर ह्याला आनंद होतो का ? त्याचे आई, वडिल, बायको, मुलगा, मुलगी स्वभावाने चांगले आहेत का? त्याला काही व्यसन आहे का ? ह्यांसह अनेक प्रश्नांवर एखाद्या व्यक्तीची कहानी अवलंबून आहे. प्रत्येकाच्या कहानीत त्याच्या घरचे असतात. तसेच बाहेरचेही असतातच. माझ्या दैनंदिन जीवनात आंनदाने काम करण्याचा स्वीकार केला तर कहानी निश्चित्च चांगली असेल.

(लेख क्र.५११)

– सुनील राऊत

माळीगल्ही, पिंगार, अ नगर.,
मो.९८२२७५८३८३

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

२१ वर्षांची नेहा इंजिनिअरिंगला शेवटच्या वर्षाला शिकत होती. अगदी गुलाबाच्या फुलाप्रमणे टवटवीत असणारी नेहा एवढ्यात अगदीच कोमेजलेल्या फुलासारखी दिसत होती. शिक्षणासाठी बाहेरगावी राहत असल्यामुळे तिचे वजन कमी झाले असेल, असे घरच्यांना वाटले. वजन कमी, डोळेही बाहेर आल्यासारखे वाटत होते. याबरोबरच सारखे छातीत धडधडणे, घाबरल्यासारखे होणे, मन एकाग्र न होणे, खूप घाम येणे ही लक्षणे दिसून आली. रक्त तपासणी केली असता TSH हार्मोन्स कमी झालेले; तर T3, T4 हार्मोन्सचे प्रमाण प्राकृत प्रमाणापेक्षा वाढले होते. यावरुन दिला हायपरथायरॉईडिझमचा त्रास असल्याचे निदान झाले. हार्मोन्सचे प्रमाण प्राकृत राहण्यासाठी ॲण्टीथायरॉइड औषधांमध्ये निआमेर्क्झोल १० एमजीची गोळी दिवसातून तीन वेळा सुरू केली.

(क्रमशः)

– डॉ. शारदा निर्मल-महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

आदर्शगाव हिवरे बाजार एन.सी.सी. युनिटच्या एक झाड शहिदांसाठी उपक्रमांतर्गत कारगिल विजयदिनानिमित्त छात्रसेनेतले वृक्षारोपण करताना छात्र सैनिक.

हिवरेबाजार एन. सी. सी युनिटचा एक झाड शहिदांसाठी उपक्रम

नगर – आदर्शगाव हिवरेबाजार येथील यशवंत माध्यमिक विद्यालयातील एन.सी. सी छात्र सैनिकांनी कारगिल विजय दिनानिमित्त एक झाड शहिदांसाठी हा उपक्रम राबविला. कारगील विजयदिनानिमित्त पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहिद जवानांसाठी ४१० झाडांची लागवड छात्र सैनिकांमार्फत आदर्शगाव हिवरे बाजारमधील गिरीमहाराज डोंगर परीसर व धापणकाईमाता डोंगर परीसरात करण्यात आली.

वृक्ष लागवडीमध्ये करवंदाची २००, आंब्याची २५, जांभळाची २५, चिंचेची ४०, उंबराची १०, कवठाची १०, बहाव २०, सिसम २५, करंज २५, अर्जुन सातडा १०, बेलाची १० आणि पिंपळाची १० रोपे लावण्यात आली. यात एन.सी. सी. छात्र सैनिकांनी सहभाग घेऊन एक पेड माँ के नाम ही मोहिम राबविली.

या उपक्रमाचे विशेष कौतुक सतरा महाराष्ट्र बटालियनचे कमांडींग अधिकारी कर्नल चेतन गुरबक्ष, लेफ्टनंट कर्नल रणदिप सिंग सुभेदार मेजर लोकेंद्र सिंग, सुभेदार बाबासाहेब कचरे यांनी केले.

शिवभक्त अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती आफ्रीकेतील ज्वालामुखी पर्वतावर पोहोचवली

अहिल्यानगरच्या कु.अंतरा नरूटे हिची कौतुकास्पद कामगिरी

नगर – शिवभक्त अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती आफ्रीकेतील टांझानिया येथील किलीमांजारो या सुप्त ज्वालामुखीच्या पर्वतावर नेण्याची कौतुकास्पद कामगिरी श्रीसमर्थ विद्या मंदिरची इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी कु. अंतरा नरूटे (वय १०) हिने केली आहे. येथील संवेदना होमिओपेथिक क्लिनिकचे डॉ.सोमेश्वर नरूटे यांची ती कन्या आहे. तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होतो आहे.

केनिया देशाच्या सीमेजवळ असलेला हा पर्वत समुद्रसपाटीपासून ५८९५ मीटर (१९३४५ फूट) उंच आहे. टांझानिया देशाच्या ईशान्य भागात पूर्व गोलार्धात ज्वालामुखीच्या उद्रेकाने तयार झालेला हा जगातील सर्वात उंच पर्वत आहे. गियोरोहणी आबड असलेले हीसी आणि धाडसी पर्वतप्रेमी किलीमांजारो पर्वताच्या शिखरावर पोहोचण्याची कामगिरी पार पाडत धन्यता अनुभवतात.

डॉ.सोमेश्वर आणि सौ.शर्मिला नरूटे या माता-पित्याने आपल्या मुलीच्या कलागुणांना वाव देत तिची आवड ओळखून प्रोत्साहन दिले. नगर जिल्ह्यामधील मांजरसुंबा येथील गोरक्षनाथ गड, रत्नगड, हरिश्चंद्रगड, कोकणकडा, कळसूबाई शिखर येथे कु.अंतरा हिने गड चढण्याचा आणि उतरण्याचा सराव केला.

कळसूबाईला तर तिने स्वच्छता मोहिम राबवली. गड आणि किल्ले पहात निसर्गाशी समरस होणे हा तिचा छंदच झाला. बालिकाश्रम रोडवरील महाबीर मल्लखांब योगा ट्रेनिंग सेंटरमध्ये तिने योगा, रोप मल्लखांब, सिल्क मल्लखांबचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण घेतले. लेझिम खेळण्यासोबत झांज व टाळ वाजवणेही ती शिकली.

सोलापूर येथील ३६० एक्सप्लोरचे संस्थापक आनंद बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली कु.अंतराने जगातील सर्वात उंच असलेल्या किलीमांजारो या पर्वतावर चढण्याचा संकल्प केला. मुंबईच्या बिमानतळावरून तिने आफ्रीकेकडे प्रस्थान केले तेव्हा तिला निरोप देताना उपस्थित सर्वांचे डोळे भरून आले होते.

किलीमांजारो पर्वतावरील चढाईचा श्रीगणेशा नंशनल पार्कपासून उत्साहात करण्यात आला. पहिल्या दिवशी मरांगुंटा ते मंडारहट हे १० किलोमीटरचे अंतर कापण्यास ६ तास लागले. मंडारहट ते हेरूंबू हे १० किलोमीटरचे अंतर कापण्यास ९ तास लागले. हेरूंबू ते किबू हे १० किलोमीटरचे अंतर पार करण्यास ८ तास लागले. किबू पॉईंट पासून पुढे काही अंतर पार केले तेव्हा समुद्रसपाटीपासून एव्हढ्ण ५,५०० मीटर, १८०००फुट उंच चढाई पूर्ण केल्याचा आनंदोत्सव साजरा करत कु.अंतरा हिने भारत देशाचा राष्ट्रध्वज तिरंगा मोठ्या उत्साहात फडकवताना राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या मूर्तीचे आणि होमिओपॅथीचे जनक डॉ.सॅम्युअल हॅनिमन यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

प्रभू श्रीरामाची आणि अयोध्या येथील मंदिराची छबी असलेला भगवा ध्वजेने फडकवला तेव्हा तिला अनामिक ऊर्जा मिळाली. एव्हढ्ण सात दिवसांचा हा प्रवास अवर्णनिय ठरला. आफ्रीकन जंगल, मुरलेंण्ड, १६००० फूट उंचीवर पोहोचल्यावर लागणारे वाळवंट, तेथील थंडी, दिवसा तसेच रात्रीच्या गडद अंधारातील प्रवास, मार्टीन आणि जस्टीन या स्थानिक गाईडकडून मिळणारी माहिती हे सर्व सांगताना अंतरा भारावून जाते. बालवयात अंतराने आफ्रीकेतील किलीमांजारो या पर्वतावर केलेल्या धाडसी चढाईचे कौतुक होत आहे.

नगर शहरात तिचे आगमन होताच ढोल – ताशांच्या गजरात अंतराचे स्वागत करण्यात आले. पेढे भरवून तिचे अभिनंदन केले जात असताना ती भारावून गेली.

आई-वडिल व गुरुमध्ये देव पहावा : वेदाचार्य महेश रेखे

नगर – आपण प्रत्यक्ष देव पाहिला नाही, पण आपली पहिली गुरु हे 'आई-वडिल' आणि ज्ञान देणारे 'शिक्षक' यांच्यातच आपण देव पहावा. देवाच्याही आधी गुरुच्या चरणी विलिन व्हावे. गुरु हे सूर्याच्या प्रकाशासारखे प्रकाशमान असतात ते आपल्या ज्ञानरुपी प्रकाशकिरण आपल्या शिष्यांना देऊन अंधकाररुपी अज्ञान नाहीसे करतात. आपल्या शिष्याला जीवनातल्या यशस्वीतेचा मार्ग दाखवतो. दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञानदान करुन सक्षमपणे जीवन जगण्याची दिशा देत आहेत, असे प्रतिपादन वेदाचार्य महेश रेखे यांनी केले.

दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सर्व विभागातर्फे गुरुपौर्णिमा उत्साहात झाला. व्यासंगी वेदाचार्य महेश रेखे, सभासद संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विश्वाताई रेखे, सेक्रेटरी सुनिल रुणवाल, खजिनदार उमेश रेखे, कार्य.सदस्य किरण बैकर, प्राचार्य सुनिल पंडित, मुख्याध्यापिका सौ.प्रतिभा धरम, सौ. अनुराधा जोशी आदि उपस्थित होते.

दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सर्व विभागाचा गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

याप्रसंगी विजयताई रेखे म्हणाल्या, गुरु एखाद्या पध्दतिच्याप्रमाणे आपल्या शिष्यांना अंधकाररुपी अज्ञानातून उचित मार्ग दाखवतात. मेहनत, जिद्द आणि चिकाटी हे गुण अंगी बाळगण्याची प्रेरणा गुरु देतात. तेव्हा विद्यार्थ्यांनी मुरुंचा आदर करुन चांगला अभ्यास करुन आपली प्रगती साधावी.

यावेळी प्रास्तविकात विजय गरड यांनी संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सर्वांगुण संपन्न बनविण्यासाठी कार्याचे औचित्य साधून त्यांच्या पत्नी स्व.मधुरा रेखे यांच्या स्मरणार्थ संस्थेस ११ हजार रुपये देणगी दिली. यातूनच त्यांची शिक्षणाबद्दल असलेली आस्था दिसून येते त्यांच्या देणगीबद्दल संस्थेच्यावतीने आभार मानतो.

यावेळी कथाकथन स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांनी गुरुच्या प्रती आदर व्यक्त करुन शिक्षकांचा सत्कार केला.

यावेळी विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

शिक्षकांच्या मदतीने प्रयत्न केले जात आहे. अभ्यासाबरोबर संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्याचे कार्य केले जात असल्याचे सांगितले.

यावेळी सुनिल रुणवाल यांनी वेदाचार्य महेश रेखे यांचा परिचय करुन देतांना सांगितले की, महेश रेखे हे घनपाठी असून, नगर शहरात वेदशाळा चालवून ज्ञानदानाचे उत्तर कार्य करत आहेत. त्यांनी घडविलेले विद्यार्थी समाजात त्यांचा कर्तुत्वाचा ठसा उमटवित आहेत. त्याचबरोबर समाज कार्यही सुरु आहे. आजच्या

सारोळा कासार (तालुका नगर) च्या उपसरपंचपदी योगिता लिंभोरे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना रविंद्र कडूस तसेच समवेत इतर ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ.

सारोळा कासारचे उपसरपंचपदी योगिता लिंभोरे यांची बिनविरोध निवड

नगर – सारोळा कासार (तालुका नगर) ग्राम पंचायतच्या उपसरपंचपदी योगिता लिंभोरे यांची बिनविरोध निवड झाली असल्याची माहीती सरपंच आरती कडूस यांनी दिली.

उपसरपंच शुभांगी विठ्ठल काळे यांचा एक वर्षाचा कार्यकाल संपल्यामुळे त्यांनी राजीनामा दिला. हे पद रिक्त झाले होते या पदाची २६ जुलै रोजी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये निवड झाली. योगिता लिंभोरे यांचा एकमेव अर्ज आल्याने हि निवड बिनविरोध झाली.

त्याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य रविंद्र कडूस, दत्ता कडूस, तुकाराम ढोरे, शुभांगी काळे, आशाबाई काळे, सुजाता नगरे, रोहित काळे, शिवाजी लिंभोरे, ग्रामसेविका जाधव, आसिफ शेख, संजय राहींज, मोहम्मद इनामदार, बाळू साळवे, गोरख काळे, महावीर संचेती, विठ्ठल काळे, संजय काळे, शहाजान तांबोली, अमोल कडूस, राज मोहम्मद शेख, सतीश गट, ऐश्वर्य मैड, आकाश कडूस, महावीर थामणे, निखिल गट, संजय कडूस, माजी उपसरपंच संदीप काळे, प्रवीण कडूस, विजय थामणे, गणेश पाटील आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

निमगाव वाघात शालेय कबड्डी, खो-खो व हॉलीबॉल स्पर्धा उत्साहात

शिक्षण सप्ताहातर्गत क्रीडा दिनानिमित्तचा उपक्रम

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयात शालेय कबड्डी, खो-खो व हॉलीबॉल स्पर्धा पार पडल्या. यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. जिल्ह्यात शिक्षण सप्ताह साजरा होत असताना क्रीडा दिनानिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम देखील पार पडला. मुला-मुलींनी सांस्कृतिक कार्यक्रमातून कलागुणांचे सादरीकरण केले. स्पर्धेचे उद्घाटन मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, मंदा साळवे, अमोल वाबळे, बाळासाहेब कोतकर, प्रमोद पिटे, भानुदास लंगोटे, तेजस केदारी, तृप्ती वाघमारे, मयुरी जाधव आदींसह शालेय शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी मैदानी खेळ महत्त्वाचा आहे. स्पर्धेतून खेळाडूंना प्रोत्साहन मिळत असते. तर स्वतःचे आत्मपरीक्षण देखील होते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये दिवसेंदिवस मैदानी खेळाचे महत्त्व कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलमध्ये न गुंतता मैदानी खेळाकडे वळण्याचे त्यांनी आवाहन केले.

उत्तम कांडेकर म्हणाले की, क्रीडा स्पर्धांतून करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध आहेत. शासकीय नोकरीसाठी खेळाडूंना जगा राखीव आहेत. बाल वयातच खेळाची गोडी निर्माण झाल्यास त्याचे आरोग्य सदृढ व निरोगी राहण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना कबड्डी, खो-खो व हॉलीबॉल स्पर्धेची माहिती देऊन खेळा विषयी मार्गदर्शन करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमात अनुराधा सुर्यवंशी, साक्षी वाघ, श्रावणी शिंदे, भक्ती शिंदे, पायल जाधव, अपूर्वा कापसे, अभिलाषा गायकवाड, निकिता निमसे, पुनम जाधव यांनी सहभाग नोंदवला होता.

अद्यावत बांधकाम साहित्याचा वापर केल्यास वेळ आणि पैसा यांची बचत होईल

ताहेर लोखंडवाला यांचे प्रतिपादन; एसा सभासदांसाठी एव्हरेस्ट इंडस्ट्रीजने नव्याने बाजारात आणलेल्या विविध उत्पादनाचे सादरीकरण

नगर – बांधकाम क्षेत्रात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात बदल होत चालले असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत बांधकाम संदर्भात नवनवीन उत्पादने तयार होत आहे, याची माहिती आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हे अर्स सभासदांना होणे गरजेचे असून त्यांच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत चांगल्या वस्तू पोहोचवण्यात येतील, त्यातून शहराच्या सौंदर्यकरणात भर पडेल, अद्यावत बांधकाम साहित्याचा वापर केल्यास वेळ आणि पैसा यांची बचत होऊन उत्कृष्ट कन्स्ट्रक्शन शक्य होईल एव्हरेस्ट इंडस्ट्रीजने नव्याने बाजारात आणल्यात यामध्ये पार्टीशन वॉल, ब्रीड सीलिंग, हेवी ड्युटी बोर्ड, रेडी मेड वॉल, डिझायनर सीलिंग, टेक्चर वॉल, सिमेंट वुड प्लांक अश्या विविध नवीन उत्पादनांची माहिती एव्हरेस्ट कंपनीचे झोनल हेड ताहेर लोखंडवाला यांनी दिली.

आर्किटेक्ट, इंजिनिअर्स अँण्ड सर्व्हेअर्स असोसिएशनच्या नगर येथील सभासदांसाठी एव्हरेस्ट इंडिस्ट्रिजने आयोजित केलेल्या उत्पादन सादरीकरण प्रसंगी कंपनीचे झोनल हेड ताहेर लोखंडवाला यांचा सत्कार करताना रमेश कार्ले. समवेत कंपनीचे व एसाचे प्रतिनिधी.

आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँण्ड सर्व्हेअर्स असो अहमदनगरच्या सभासदांसाठी एव्हरेस्ट इंडस्ट्रीजने नव्याने बाजारात आणलेल्या विविध उत्पादनाचे सादरीकरण आयोजित केले होते.

यावेळी रिजनल सेल्स मॅनेजर आकांक्षा सेठी, असी सेल्स मॅनेजर निलेश जगताप, टेक्निकल वेस्ट झोन हेड श्रेयांस पाटील, नगर मधील हीस्ट्रिब्यूटर एस एस इंटरनॅशनलचे सुनिल रहाणे, संजय शिंदे, महेश मुंडे, नामदेव मुरकुटे, जितेंद्र शर्मा, सुनिल रहाणे, महेश मुंडे, संस्था उपाध्यक्ष आदिनाथ दहिफळे, सचिव प्रदिप तांदळे, वैभव फिरोदिया, सुनिल ओटी, संकेत पटवे, मयुरेश देशमुख, उदय तरवडे, यश शहा, वैभव देशमुख, संदीप काकानी, शिरीष कुलकर्णी, जितेश सचदेव, अजित माने, अशोक मवाळ, प्रकाश जैन, संजय पवार, देवेंद्रसिंग वधवा, प्रणाली तांदळे, पायल शहा आणि सभासद उपस्थित होते.

यावेळी बोलताना संस्था अध्यक्ष रमेश कार्ले यांनी नगरमध्ये नवीन बांधकाम साहित्याचा वापर करुन आधुनिक पद्धतीने काम करण्यास एव्हरेस्ट सारख्या ब्रँडेड कंपनीची उत्पादने उपयुक्त असल्याचे नमूद केले.

एव्हरेस्ट ही ब्रँडेड कंपनी असून त्यांची उत्पादने ही रहिवाशी, शैक्षणिक तसेच वाणिज्य आणि औद्योगिक इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात वापरता येतात. फॉल सीलिंग मध्ये मटेरियल बेंड न होणे, जास्त आयुष्य आणि पुष्कळ डिझाईन पर्याय त्यामध्ये उपलब्ध असल्याचे निलेश जगताप यांनी नमूद केले.

यावेळी संस्थेच्या या वर्षी कमिटी हेड पदी काम केलेल्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला यामध्ये एसा दिनदर्शिकेसाठी सुरेंद्र धर्माधिकारी, स्पोर्ट्स विक साठी भूषण पांडव, शासकीय कामकाज कमिटी साठी रत्नाकर कुलकर्णी, बेब साईट कमिटीसाठी विजयकुमार पादीर, बेस्ट स्टूव्हर अवॉर्ड साठी अन्वर शेख, एसा सांस्कृतिक कमिटी हेड सुनिल हळगावकर यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी सचिव प्रदिप तांदळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

नवीन मराठी शाळेत फॅन्सी ड्रेस स्पर्धेत रंगला बालकांचा कलाविष्कार

नटसम्राट, बाजीप्रभू, राजमाता जिजाऊ व्यक्तिरेखांबरोबरच शेतकरी, कचरा, प्लॅस्टिक समस्याबाबत जागृती

नगर – विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास यासाठी अहमदनगर एज्युकेशन सोसायटी संस्थेकडून प्रधम प्राधान्य दिले जाते. त्यासाठी प्रत्येक महिन्याला वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्याचाच एक भाग म्हणून नवीन मराठी शाळा विश्रामबाग येथे फॅन्सी ड्रेस स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्कारांनी पालकांना मंत्रमुग्ध केले.

अ.ए.सो.च्या नवीन मराठी शाळेत फॅन्सी ड्रेस स्पर्धेत रंगलेल्या बालकांनी कलाविष्कार सादर केला. त्याप्रसंगी विविध वेशभूषेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, पालक-शिक्षक दिसत आहेत.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळेत या स्पर्धा तीन दिवस सुरु होत्या. प्रशालेच्या नूतन मुख्याध्यापिका वनिता गोत्राळ यांनी सरस्वती पूजन करुन स्पर्धांची सुरुवात करुन दिली. २३ जुलै रोजी इयत्ता पहिली दुसरी मधील ३५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. २४ जुलै रोजीच्या इयत्ता तिसरी व चौथी च्या वर्गातील २८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. तर २५ जुलै रोजी इयत्ता पाचवी ते सातवी वर्गातील २७ विद्यार्थ्यांनी आपला कलाविष्कार सादर केला.

यामध्ये पृथ्वीराज भवर, प्रिशा भंडारी, हर्षदीप काळे, रागिणी निंबाळकर (सर्व इ.पहिली), मनस्वी भगमने, विक्रांत तोरडमल, देवकर वांशिका, अनुराग कलमुंडे, (सर्व इ. दुसरी), तनुज काकडे, ईश्वरी कोके, राजवीर कराळे, सौम्या कोडीलकर (सर्व इ. तिसरी), साहिल सय्यद, प्रगिती तोरडमल, दुर्वा निमसे, ओमराजे भालसिंग.

(सर्व इ. चौथी), हर्षवर्धन मोरे, ओवी आव्हाड (इ. पाचवी), समर्थ लोंढे, तेजस्विनी सावंत (इ. सहावी), ओम लांडगे, तेजस्विनी शेटे (इ. सातवी) यांनी प्रथम क्रमांक पटकाविले. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी नटसम्राट, गाडवाच लढ़, शेतकरी, राजमाता जिजाऊ, पाण्याचा थेंब, डॉ.बाबासाहेब अंबेडकर, बाजीप्रभू, देशपांडे, सावित्रीबाई फुले,भाजीवाली, प्लॅस्टिक वापर टाळा, कचरा समस्या, शेतकरी आत्महत्या, दुधवाला, छत्रपती शिवराय अशा विविध व्यक्तिरेखा सादर केल्या.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मूथा, खजिनदार प्रकाश गांधी, मुख्याध्यापिका वनिता गोत्राळ यांनी अभिनंदन केले आहे. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी लीना पाटोळे, कविता धर्माधिकारी, रवी चांदेकर, गणेश चौरे, कोमल डिने, मयूर धाडो, दीपक कराळे, योगिता कासार, संगीता भंडारी, पारुनाथ ढोकळे, सिमरन मोमीन, वैभव मदने, सौरभ खेडकर आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

युवक काँग्रेसच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी सौ. तनवीर शेख यांना आ. बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार निलेश लंके, हेमंत ओगले, करन ससाणे, जयंत वाघ, अण्णासाहेब शेलार, युवक शहर जिल्हाध्यक्ष मोसीम शेख, शाभराव वागस्कर, बाळासाहेब भंडारी, अभिजीत कांबळे, भुषण चव्हाण, अकदस शेख, सागर इरमल, नवाज शेख, सुरेश झावरे, जमील शेख, साहेबराव चौधरी, अनिल वराडे, शिरीन बागवान, इरशाद शेख, पूजा लोखंडे आदी.

आपण आजारी नसताना

हात-पाय गळून जाणे.
अंग दुखणे, पाठ दुखणे.
कंबर दुखणे, थकवा येणे.
काम्याचा उत्साह नसणे.
अशक्तपणा वाटणे.

सर्व आजारांसाठी एँडमिट सुविधा उपलब्ध.
सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

डॉ.सौ. उर्मिला गिते
या सर्व तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
अक्षय मुलांचे हॉस्पिटल व प्रसुतिगृह
बालिकाश्रम रोड, अ.नगर.
मो. 9422740888

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद अहमदनगर उपनगर शाखेच्या मस्त नाटक योजनेचा शुभारंभ

नगर – अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद अहमदनगर उपनगर शाखेच्या वतीने गेल्या काही वर्षांपासून नाट्यकलेचा प्रचार, प्रसार आणि विकास व्हावा या मूळ उद्देशाला अनुसरून विविध सांस्कृतिक आणि नाट्यविषयक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. याचाच एक भाग म्हणून शाखेच्या वतीने मस्त नाटक योजना या एक वार्षिक सभासद नाटक योजनेचा नुकताच शुभारंभ करण्यात आला. याप्रसंही श्रीमती छायाताई फिरोदिया, डॉ. सुधा कांकरिया, उद्योजक गौतम मुनोत, रोटरी क्लब ऑफ मिडटाउन चे नूतन अध्यक्ष अजय पिसुटे, सीए सनीत मुथा उपस्थित होते.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद अहमदनगर उपनगर शाखेच्या मस्त नाटक योजनेचा शुभारंभप्रसंगी उपस्थित सदस्य.

गेल्या अनेक वर्षांपासून मागणी असलेली नाटक योजना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या उपनगर शाखेने सुरू केली याबद्दल त्यांचे अभिनंदन नगरकर रसिकांची अनेक वर्षांपासूनची इच्छा या निमित्ताने पूर्ण होईल असे प्रतिपादन याणिमित्ताने श्रीमती छायाताई फिरोदिया यांनी केले.

या नाटक योजनेमुळे आता नगरकर रसिकांना चांगली दर्जेदार नाटके बघता येतील तसेच या निमित्ताने नगरच्या नाट्यसृष्टी एक चांगली इकोसिस्टीम तयार होईल असे मत उद्योजक गौतम मुनोत यांनी केले.

अशा प्रकारच्या योजनांमुळे नगर शहरात पुन्हा एकदा नाट्य चळवळ वाढण्यास आणि रुजण्यास मदत होईल तसेच प्रेक्षकांसाठी ही एक आनंदाची पर्वणी ठरेल असे मत डॉक्टर सुधा कांकरिया यांनी व्यक्त केले.

या योजनेअंतर्गत वर्ष भरात पाच व्यावसायिक नाटकांचे प्रयोग आणि एक विशेष कार्यक्रम सभासदांना दाखवण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात २३ ऑगस्ट रोजी प्रशांत दामले यांच्या ' गेला माधव कुणीकडे ' या नाटकाने केली जाणार आहे, अशी माहिती उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद बेडकर यांनी दिली. नगरकर रसिकांनी लवकरात लवकर या योजनेचे सभासदत्व घ्यावे आणि या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन परिषदेच्या वतीने प्रमुख कार्यवाह सौ. चैत्राली जावळे यांनी केले आहे.

या कार्यक्रम प्रसंगी उद्योजक चिन्मय सुखटणकर, डॉक्टर राजीव सूर्यवंशी, शंतनु खानविलकर, डॉक्टर प्रकाश कांकरिया, उद्योजक गौरव फिरोदिया आणि सौ. कल्याणी फिरोदिया सौरु असोसिएशनचे अध्यक्ष सौ सनित मुथा, सौ. हानेबर काळे, डिझायनर हानेश शिंदे, निखिल कुलकर्णी, डॉ. चिटणीपौर, रोटरी क्लबच्या विविध लवकचे अध्यक्ष आणि सचिव यासह परिषदेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

'डॉ.झाकीर हुसैन आधुनिकीकरण योजनें'तर्गत मदरशांनी १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करावेत

नगर – सन २०२४-२५ या वर्षासाठी मदरशांना पायाभूत सुविधा व शिक्षकांचे मानधन देण्यासाठी डॉ. झाकीर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजनेर्गत इच्छुक मदरशांनी १५ सप्टेंबरपर्यंत विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज जिल्हा नियोजन, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे सादर करण्याचे आवाहन दीपक दातीर, जिल्हा नियोजन अधिकारी यांनी केले आहे.

योजनेचा लाभ राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असलेल्या मदरसांना दिला जाईल. ज्या मदरशांना स्कीम फॉर प्रोव्हायडींग क्वालिटी एज्युकेशन इन मदरसा या केंद्र पुरस्कृत योजनेर्गत लाभ मिळालेला आहे अशा मदरशांना ही योजना अनुज्ञेय राहणार नाही. मदरशांमध्ये विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी व इंग्रजी या विषयांचा अभ्यासक्रम राज्य शासनाच्या अन्य शाळांप्रमाणेच राहील. मदरशांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांचे प्रतिदिन पाच तासिकाप्रमाणे कामाचे तास निश्चित करण्यात येतील.

या योजनेंतर्गत खालील पायाभूत सुविधांसाठी अनुदान देय आहे

मदरशाच्या इमारतींचे नुतनीकरण व डागडुजी, पेयजलाची व्यवस्था करणे, प्रसाधनगृह उभारणे, डागडुजी करणे, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक फर्निचर, मदरशांच्या निवासस्थानात इनव्हर्टरची सुविधा निर्माण करणे, मदरशांच्या निवासी इमारतीचे नुतणीकरण व डागडुजी, संगणक, हार्डवेअर, सॉफ्टवेअर, प्रिंटर्स, प्रयोगशाळा साहित्य सायन्स किट मॅथेमॅटीक्स किट व इतर साहित्य.

शासनाच्या ११ ऑक्टोबर २०१३ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज सादर करावेत. शासन निर्णय व अर्जाचा नमुना http://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शाळा, महाविद्यालयांनी पायाभूत सुविधांसाठी १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करावेत

नगर –अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खासगी अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका, नगरपरिषद शाळा, दिव्यांग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी व शिक्षकांचे मानधन देण्यासाठी २ लक्ष रुपये इतके अनुदान देण्यात येत असून इच्छुक संस्थांनी सन २०२४-२५ या वर्षासाठी त्यांचे विहित नमुन्यातील अर्ज १५ सप्टेंबर पर्यंत जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे सादर करण्याचे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांनी केले आहे.

योजनेचा लाभ राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असलेल्या मदरसांना दिला जाईल. अल्पसंख्याक समाजाचे (मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शिख, पारशी व ज्यु) किमान ७० टक्के विद्यार्थी शिक्षण घेत असणे आवश्यक आहे. शासनमान्य दिव्यांग शाळांमध्ये (मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शिख, पारशी व ज्यु) किमान ५० टक्के अल्पसंख्यांक विद्यार्थी शिक्षण घेत असणे आवश्यक आहे.

या योजनेंतर्गत खालील पायाभूत सुविधांसाठी अनुदान देय आहे

शाळेच्या इमारतींचे नुतनीकरण व डागडुजी, संगणक कक्ष उभारणे,अद्ययावत करणे, शैक्षणिक कार्यासाठी आवश्यक फर्निचर, इन्व्हर्टरची सुविधा निर्माण करणे, अध्ययनाची साधने, अध्ययनासाठी लागणारे विविध सॉफ्टवेअर, ईग्रंथी ग्रॅबेज लॅब, शुध्द पेयजलाची व्यवस्था करणे, प्रयोगशाळा उभारणे, अद्ययावत करणे, प्रसाधनगृह, स्वच्छतागृह उभारणे, डागडुजी करणे, झेरॉक्स मशीन, एल.सी.डी प्रोजेक्टर, संगणक हार्डवेअर सॉफ्टवेअर, ग्रंथालय अद्ययावत करणे या पायाभूत सुविधांसाठी अनुदान देण्यात येते.

शासनाच्या ७ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज सादर करावेत. प्रत्येक शैक्षणीक संस्थेने UDISE CODE, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी इन्स्टीट्युट कोड तसेच दिव्यांगांच्या शाळांनी लायसन्स नंबर देणे आवश्यक आहे. शासन निर्णय व अर्जाचा नमुना http://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर श्रावक संघाचा ५१ लाख नवकार महामंत्र जपाचा संकल्प

छत्रपती संभाजीनगर – आचार्य भगवंत आनंदऋषीजी म.सा. यांचा १२५ वा जन्मोत्सव ऐतिहासिक करण्यासाठी ४ ते ६ ऑगस्टदरम्यान छत्रपती संभाजीनगर येथे गुरू आनंद जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त ५१ लाख नवकार महामंत्र जप व २१०० अठ्ठाई प्रत्याख्यान (उपवास) चा संकल्प करण्यात आला आहे. हा सोहळा 'याचि देही याचि डोळा' अनुभवण्यासाठी देशभरातील भाविक शहरात येणार आहेत.

गुरू आनंद जन्मोत्सवासाठी येणार देशभरातील भाविक

उपाध्याय प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जुलैपासून 'उद्धान' या युवक म होत्सवाची सुरुवात झाली. या तीन दिवसीय महोत्सवात पहाटे ५ वाजेपासून तर रात्री ९:३० वाजेपर्यंत विविध सत्र घेण्यात येत आहेत.

देशभरातील ४१६ जण यात सहभागी झाले आहेत. छत्रपती संभाजीनगरसह बीड, नगर, पुणे, चाकण, तळेगाव यांसह जम्मू-काश्मीर, जोधपूर, बंगळुरू, चेन्नई येथूनही युवक- युवती आलेल्या आहेत. पहिल्याच दिवशी या शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे.

देशभरातील ४१६ युवक-युवतींचा सहभाग

उपाध्याय प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जुलैपासून 'उद्धान' या युवक महोत्सवाची सुरुवात झाली. या तीन दिवसीय महोत्सवात पहाटे ५ वाजेपासून तर रात्री ९:३० वाजेपर्यंत विविध सत्र घेण्यात येत आहेत.

देशभरातील ४१६ जण यात सहभागी झाले आहेत. छत्रपती संभाजीनगरसह बीड, नगर, पुणे, चाकण, तळेगाव यांसह जम्मू-काश्मीर, जोधपूर, बंगळुरू, चेन्नई येथूनही युवक- युवती आलेल्या आहेत. पहिल्याच दिवशी या शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे.

आजपासून आनंदगाथा

आचार्य भगवंत आनंदऋषिजी म.सा. यांच्या जीवनावरील 'आनंदगाथा' २७ जुलैपासून सुरू होत आहे. गाथा रात्री ९:३० ते १०:३० वाजेदरम्यान होणार आहे. २ ऑगस्टला या गाथेची सांगता होईल. यासंदर्भात आयोजित पत्रपरिषदेत वर्धमान श्वेतांबर स्थानकवासी जैन श्रावक संघाचे मंत्री इंद्रचंद संचेती यांनी माहिती दिली.

आचार्य भगवंत आनंदऋषिजी म.सा. यांच्या जीवनावरील 'आनंदगाथा' २७ जुलैपासून सुरू होत आहे. गाथा रात्री ९:३० ते १०:३० वाजेदरम्यान होणार आहे. २ ऑगस्टला या गाथेची सांगता होईल. यासंदर्भात आयोजित पत्रपरिषदेत वर्धमान श्वेतांबर स्थानकवासी जैन श्रावक संघाचे मंत्री इंद्रचंद संचेती यांनी माहिती दिली.

अश्लिल चाळे सुरू असलेल्या सावेडी उपनगरातील दोन कॅफेवर पोलिसांचे छापे

नगर – शाळा-कॉलेजच्या मुला-मुलींना अश्लिल चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या सावेडी उपनगरातील दोन कॅफेवर तोफखाना पोलिसांनी शुक्रवारी (दि.२६) सायंकाळी छापेमारी केली. कॅफे चालकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून तेथे अश्लिल चाळे करताना पकडलेल्या मुला-मुलींना समज देऊन सोडून देण्यात आले आहे.

मनमाड स्स्यावरील डोले हॉस्पिटलजवळ मेलडी कॅफेत तसेच पंपिंग स्टेशन रोडवर ताठे नगर येथील स्टार कॅफेत शाळा- कॉलेजच्या मुला- मुलींना अश्लिल चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली जात असल्याची माहिती तोफखाना पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे तोफखान्याचे पो.नि. आनंद कोकरे यांनी पोलिस उपनिरीक्षक शैलेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शोध पथकातील अंमलदारांच्या २ टीम तयार करून छापे टाकले.

या ठिकाणी कॅफेच्या नावाखाली प्लायवुडचे कंम्पार्टमेंट करून, पडदे लावून अंधार करून मुला- मुलींना अश्लिल चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिल्याचे समोर आले. दोन्ही ठिकाणी अनेक मुले - मुली आढळून आल्या. त्यांना समज देवून सोडून देण्यात आले. डोले हॉस्पिटलजवळ मेलडी कॅफेचा मालक शिरीष शरद संसारे (रा. भगवानबाबा चौक, निर्मलनगर) याच्याविरुद्ध पो.कॉ. बाळासाहेब भापसे यांच्या फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्यात आला तर पंपिंग स्टेशन रोडवर, ताठे नगर येथील स्टार कॅफेचा मालक ओंकार कैलास ताठे (रा. ताठेनगर, सावेडी) याच्या विरुद्ध पो. कॉ. दत्तात्रय कोतकर यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हुक्का पार्लरवरही छापा मारत कारवाई

सावेडी उपनगरातील दोन कॅफेवर कारवाई केल्या नंतर पोलिसांच्या या पथकाने रात्री ७.४५ च्या सुमारास सोनानगर चौक परिसरात असलेल्या इंजिस कॅफे या हुक्का पार्लर वर छापा मारत कारवाई केली. या ठिकाणी ५ हजार ९०० रुपये किमतीचे हुक्का पिण्याचे साहित्य जप्त केले. या पार्लरचा मालक दिलीप अशोक भटेजा (रा. लेबर कोर्ट जवळ, सावेडी) याच्या विरुद्ध पो.कॉ.सतीश विघुवन यांच्या फिर्यादी वुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर

मुख्य कार्यालय : महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक ता. नगर कार्यालयाशेजारी, अहमदनगर. फोन (०२४२) १३२९९१४. E-mail: dist_fed@rediffmail.com

जा.क्र. पासंफे/ रेव्हेनिव्ह/१९९९/सन २०२४ दिनांक २१/०६/२०२४

स्थावर मालमत्ता जप्ती हुकूम

जण अर्जी ओव गणती सहकारी पतसंस्था मर्यादित, नगर, ता. जि. अहमदनगर यांनी जाणी नमूद केलेल्या सहकारीराजनिक्ड महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९९०चे कलम १०१/९८ अन्वये वसूली दाखली निवाडिये अन्वे, त्यांच्याकडे दिलेल्या मागणी दीनांक बजावली आहे. तरीही त्यांनी त्यांच्याकडील रकम थकी असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९९०चे कलम १०९ व नियम १०७/१० नुसार मला वा, जिल्हा उप-निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरून मी एम. ए. शेख, विशेष वसूली व मिळ्कत अधिकारी खालील नमूद स्थावर मालमत्ता थकित येणे रकम वसूलीकरिता सदर बाबीस आणे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९९०चे कलम १०९नुसार खालील दिलेल्या तारखेस सदर स्थावर मालमत्तेचे बोलणी करणारी संस्थांना/इतर व्यक्तींना स्थावर मालमत्तेत आलेली असेल किंवा किंवा किंवा अथवा निबंधक कोणताही भाग, गहाण, दान हस्तान किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल, तर त्या सर्व बाबी पतसंस्थेकडे बाकीत रु/निर्णय दाखल.

अ. नं.	थकबाकीदाराचे नाव	गाव	वसुली दा. रक्कम	गट नं./पर्वात नं./मिळकत नं.	स्थावर मिळकत क्षेत्र हे. आर.	आकार रु. पै.	चतुःसिमा पूर्व/पश्चिम/दक्षिण/उत्तर
१	कर्जदार – निलेश पोपट दळवी यांची मिळकत जामिनदार – यासीन नासर अरब जामिनदार – नासर महंमद अरब जामिनदार– सुहास विंचरू मोहनकर जामिनदार – अशोक मुरलीधर गुरव	संगेवाडी,चास, ता.नगर	४५१८४७/– + हप्ता वर्ष + होणारे व्याज	१०	०.३४	३.४१	मूळ नकाशा प्रमाणे
२	कर्जदार – यासीन नासर अरब यांची मिळकत जामिनदार – निलेश पोपट दळवी जामिनदार – प्रताप मिसाजी निमसे जामिनदार – जैनुद्दीन अब्दुल करीम पठाण	केडगाव, ता.नगर	३५७६०१/– + हप्ता वर्ष + होणारे व्याज	५१/३/अ/एनाट/८/९/१०/१	१.०१.२५	१०.१३	मूळ नकाशा प्रमाणे

हा जाहीर प्रगिद्ध झाल्यापासून तीन दिवसांच्या आत वसुलपात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज व चलन्यात वरीलप्रमाणे जात केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्यात येईल व ज्यासंबंधात वसुली थकली आहे, त्यांनी त्यांच्याकडील वसूल पात्र स्थावर मालमत्ता किंवा जप्तीत, नमित व्यवहार नाहीत लिलावाचे निर्णयी मंजूर झाल्यास ही वसूल पात्र रक्कमेपलती रक्कम व आलेलाच जाणिवपूर्वकच्या वसूली थकली आहे, त्यांनी त्यांची जाणिवपूर्वकने नोंद घ्यावी.

सही/– (एम. ए. शेख),
विशेष वसूली व मिळ्कत अधिकारी,
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सह. फेडरेशन मर्या., अहमदनगर.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : २६/०६/२०२४

शिक्का

!! श्री कुलस्वामीनी प्रसन्न !!

गोविंदा ! गोविंदा !! गोविंदा !!!

श्री तिरुपती बालाजी

दर्शनसह श्री पद्मावती, गोविंदराज दर्शनसह कोल्हापूर महालक्ष्मी

महाराष्ट्र दि. ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० गोविंदा २०२४
बुकिंग दि. १५ पर्यंत महाराष्ट्र कुल (स्थानीय शिवाय)

★ उपलब्धीच स्थळे ★
श्री पद्मावती मंदिर, तिरुपती, आंध्रप्रदेश
श्री तिरुपती बालाजी मंदिर, तिरुपती, आंध्रप्रदेश
श्री कोल्हापूर महालक्ष्मी मंदिर, कोल्हापूर, महाराष्ट्र
श्री कार्तिकस्वामी मंदिर, टिरुचेंदूर, तामिळनाडू

₹ 6501/-

★ प्रमाणित ऑपरेटर ★
सुप्रीम टिकाव ट्रॅव्हल्स, ३, २, नेताजीपेठ, नगर, महाराष्ट्र.
मोबाईल क्रमांक ३ (२०२४ पैकी) शिवाय तिरुपती दर्शन सुलभ व सोयीचे व्यवस्था, विश्वास व्यवस्था किंवा विश्वासपात्र, दर्शन सेवा

Amar Pawar Holidays & Multiple services

★ ऑफिस ★
नगर : मो. ९२२६७०६६६१ / ९६२१४६४६६ | कुकाणा : मो. ९७४९१६३७७७
कराड : मो. ९९७०९२११७ / ९०१९२२१२१७ | नाशिक : मो. ९६०२६०४०६१ / ९८३४१५४१३
नाशिक : मो. ९९२२९१२१ / ९१४९३२४०३

दर्जेदार व माफक दरात
संपर्क : 9403232323
फ्लेक्स प्रिंटींग

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अहमदनगर

जाहीर ई-निविदा सुचना क्रमांक - 5/2024-2025

अहमदनगर जिल्हातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत पुलाचे बांधकाम व ५ वर्ष देखभाल व दुरूस्तीच्या २ रॅकेजेसची १ सुलांची कामे एकूण अंदाजित किमत रक्कम रू. ३७१.८६ लक्ष व देखभाल व दुरूस्ती रक्कम रू. ४.४० लक्ष ई-निविदा मागविण्यात आहेत.

सदर कामांची सविस्तर ई-निविदा https://www.pmgsytenders.gov.in या वेबसाईटवर दि. 27/07/2024 पासून उपलब्ध आहे.

ई-निविदा सुचना क्र.	एकुण कामे	एकत्रित अंदाजित किंमत
5/2024-2025	२ कामे	रू. ३७१.८६ लक्ष

सही/–
(प्र.म.पेंडाळे)
कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अहमदनगर

"हर काम देश के नाम"

CANTONMENT BOARD OFFICE
AMX Chowk, Camp Ahmednagar-414002 (MS)
Email : ahmednagarcantt@gmail.com Website: ahmednagar.cantt.gov.in

No. ANR/SAN/SWM/Bye-Laws/2024 Date - 26-07-2024

PUBLIC NOTICE

In exercise of the powers conferred by Section 348 of the Cantonments Act,2006 (41 of 2006) read with rule 15 of the Solid Waste Management Rules, 2016, the draft bye laws namely Ahmednagar Cantonment Board Solid Waste Management Bye-Laws, 2024 is published by the Central Government in the Gazette of India, Extraordinary Part-II Section 4 vide notification S.R.O. 22(E) dated 22nd July, 2024 of the Government of India, Ministry of Defence, New Delhi as required by sub-section (1) of Section 350 of the Cantonment Act, 2006 and is available on e-gazette portal https://egazette.gov.in, official website of the AHMEDNAGAR Cantonment Board https://ahmednagar.cantt.gov.in/ and Notice Board of Ahmednagar Cantonment Office for information of all persons likely to be affected thereby and notice is hereby given that the said draft bye-laws will be taken into consideration by the Central Government after the expiry of thirty days from the date on which the copies of the Gazette of India in which the notification is published are made available to the public;

The objections or suggestions if any, to these draft bye-laws may be addressed to the Chief Executive Officer, Office of the Cantonment Board Ahmednagar. AMX Chowk, Camp Bhingar, AHMEDNAGAR -414002.

Any objection or suggestion which may be received from any person with respect to the said draft bye-laws, before the expiry of aforesaid period shall be considered by the Central Government.

(Vikrant More)
Chief Executive Officer
Ahmednagar Cantonment Board

"हर काम देश के नाम"

अहमदनगर छावनी परिषद

एएमएक्स चौक, कैम्प भिंगार, अहमदनगर - ४१४००२

Email : ahmednagarcantt@gmail.com Website: ahmednagar.cantt.gov.in

सं.एएमआर/सएएन/एसडब्ल्यूएम/उपनियम/२०२४ दिनांक : २६/०७/२०२४

सार्वजनिक सूचना

छावनी अधिनियम, २००६ (२००६ का ४१) की धारा ३४८ द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए ठोस अपशिष्ट प्रबंधन नियम, २०१६ के नियम १५ के साथ, अहमदनगर छावनी परिषद ठोस अपशिष्ट प्रबंधन उपनियम, २०२४ नामक मसौदा उपनियमों को केंद्र सरकार द्वारा छावनी अधिनियम, २००६ की धारा ३५० की उपधारा (१) के अनुसार भारत के राजपत्र, असाधारण भाग–II खंड ३ में भारत सरकार, रक्षा मंत्रालय, नई दिल्ली की अधिसूचना का.नि.आ. २२ (अ) दिनांक २२ जुलाई, २०२४ के तहत प्रकाशित किया गया है और यह मसौदा उपनियम ई–गजट पोर्टल https://egazette.gov.in, अहमदनगर छावनी बोर्ड की आधिकारिक वेबसाइट https://ahmednagar.cantt.gov.in/ तथा अहमदनगर छावनी कार्यालय के नोटिस बोर्ड पर उपलब्ध है, ताकि इससे प्रभावित होने वाले सभी व्यक्तियों की जानकारी मिल सके तथा इसके द्वारा यह सूचित किया जाता है कि उक्त मसौदा उप–नियमों पर भारत के राजपत्र की प्रतियां, जिसमें अधिसूचना प्रकाशित की गई है, जनता को उपलब्ध कराए जाने की तारीख से तीस दिन की समाप्ति के पश्चात केंद्र सरकार द्वारा विचार किया जाएगा;

इन मसौदा उप–नियमों पर कोई आपत्ति या सुझाव, यदि कोई हो, मुख्य कार्यकारी अधिकारी, छावनी बोर्ड कार्यालय अहमदनगर, एएमएस चौक, कैम्प भिंगार, अहमदनगर –४१४००२ को संबोधित किया जा सकता है।

उक्त मसौदा उप–नियमों के संबंध में किसी व्यक्ति से पूर्वोक्त अवधि की समाप्ति से पूर्व प्राप्त किसी आपत्ति या सुझाव पर केन्द्रीय सरकार द्वारा विचार किया जाएगा।

विक्रांत मोरे
मुख्य कार्यकारी अधिकारी
अहमदनगर छावनी परिषद

ग्रामपंचायत सावळीविहिर बु., ता. राहाता, जि.अहमदनगर
जाहीर निविदा

खालील कामाचे नोंदणीकृत ठेकेदार, पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी-१ निविदा दरपत्रके मागविणेत येत आहे.

कामाचे नाव	योजना	अंदाजपत्रकीय रक्कम	ठेकेदारचा वर्ग
गौळे सावळीविहिर बु. ता. राहाता येथे कारवाडी पाणी पुरवठा तलाव दुरुस्त करणे.	१५ वित्त आयोग ग्रामपंचायत स्तर सन २०२२-२३	४२२५१६	सुबे
गौळे सावळीविहिर बु. ता. राहाता येथे पाणी पुरवठा करणाऱ्या बारोमा गेट करणे.	१५ वित्त आयोग ग्रामपंचायत स्तर सन २०२२-२३	८४२४१	सुबे
गौळे सावळीविहिर बु. येथील सार्वजनिक स्मशानभूमी ते गाव करणे (कारवाडी रोड व गावठाण परिसर) ता. राहाता.	ग्रामनिधी सन २०२४-२५ योजनेतील जुने ग्रामपंचायत	६९९८७	सुबे
गौळे सावळीविहिर बु. ता. राहाता येथे बंदिस्त गटारीसहित फुटलेले ढापे नविन टाकणे.	ग्रामनिधी सन २०२४-२५	९८६६७	सुबे
गौळे सावळीविहिर बु. ता. राहाता येथील जुने ग्रामपंचायत कार्यालय इमारत पाडणे.	ग्रामनिधी सन २०२४-२५	५०२४७०	सुबे

अटी व शर्ती :- १) निविदा फॉर्म माहिती पत्रक दि. २७/०७/२०२४ ते २/०८/२०२४ या कालावधित ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी-१ निविदा दि. ३/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. ३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखुन ठेवला आहे. निविदेसोबत १) जी.एस.टी ३) पॅन कार्ड ४) अनुभवाचा दाखला

ग्रामसेवक /सरपंच
सावळीविहिर बु., ता.राहाता, जि.अहमदनगर

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणे येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली जमीन विक्रमान मालक **१. योगेश श्रीरंग गोरे २. आशा दीपक गोरे रा. जराती शाळा मागे मारवाडगल्ली नागरदेवळे, जि. अहमदनगर.** यांचे मालकी हक्काची व सक्षिदारीची असुन त्यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करून आमचे अशिलांबरोबर कायमचाच खरेदी देण्याचे ठरवुन आमच्या अशिलाकुन रक्कम स्विकारलेली आहे. तरीच सदर जमीन विक्रळत ही निर्बंध, निर्णयांची व बोजाहीत असल्याची विक्रास व भरवसा आमचे अशिलांनि दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन विक्रळती बक्ष कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मगाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणतेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन निळकणीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणतेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी सोडुन दिले आहे असे समजण्यात येईल.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन - जिल्हा अहमदनगर पोटतुकडी नगरपंचेकी जिल्हा परिषद हद्दीतील मौजे **मारवाडगल्ली** येथील खालील वर्णनाची मिळकत–

सर्व्हे नं.	हे. आर.	रू. पै.
११/३	०.३८	६. ४४

वापरेची विद्यमान मालक यांचे मालकीची संपूर्ण व्हे. ०१.५० आर (१६५४.०० चौ. फुट) जागा त्यावरील आर. सी. सी. मधील दुकान बांधकाम क्षेत्र १५००.०० चौ. फुटा निशीतल प्लॉट नं. २ असा असुन ही संपूर्ण बांधकामासह जमीनीबाबत.

चतुर्दी चतुःसिमा :

पुर्वेस – रस्ता
दक्षिणेस – निवांजीत वाळनी प्लॉट नं. २ पैकी मेहमूद कुमार जाट यांची मिळकत
पश्चिमेस – सर्व्हे नं. ११/१
उत्तरेस – निवांजीत वाळनी प्लॉट नं. ३ व सर्व्हे नं. ११/१
वेगेप्रमाणे चतुःसीमापुर्वक काही एक राखुन न देविता.

दि. २७/०७/२०२४
अहमदनगर.

अॅड. नागिन अहमद इस्माईल शेख
अॅड. कुरेशी कैलास फारुक
जुन्या कलेक्टर ऑफिस जवळ, शहरगंज, अहमदनगर
मो. ९८८१४३१८८० / ७३७६२४२४८८

निरामय

डाइटिंगशिवाय वेट लॉस?

लाईफस्टाईल

डाएटिंग नावाखाली उपासमार करून वजन कमी करता येत नाही. म्हणूनच डाएटिंगच्या नादात आपण आरोग्याची हेळसांड तर करत नाही ना, याकडे लक्ष द्यायला हवं. कमी खाल्ल्याने चयापचय क्रियेचा वेग मंदावणं, सतत खावंसं वाटणं, भूक वाढणं, पोट फुगणं, बद्धकोष्ठता, हाडं ठिसूळ होणं, डोकेदुखी यासारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळेच त्या टाळून जीवनशैलीत थोडे बदल आणि नियमित व्यायाम केला तरी वजन कमी होऊ शकतं.

* अन्न नीट चावून खाल्ल्याने पोट लवकर भरतं. कमी कॅलरीज पोटात जातात. वजन कमी करण्याचा हा साधा उपाय आहे.
* प्रथिनयुक्त आहारामुळे पोट जास्त वेळ भरलेलं राहतं. स्नायूंच्या बळकटीसाठी तसंच टिश्यूंच्या दुरुस्तीसाठीही प्रथिनं गरजेची असतात.
* फायबरयुक्त आहारामुळे पचनक्रिया सुधारते. पोट बराच काळ भरलेलं राहतं.
* पाणी तसंच इतर पोषक द्रवपदार्थांच्या सेवनामुळे वजन कमी होण्यास मदत होते.
* पुरेशी झोप घेतल्याने तणाव कमी होतो परिणामी वजन कमी होऊ शकतं.

आरोग्य समस्यांवर एआयची मदत

आरोग्यवेध

जुनाट आजारांनी ग्रासलेल्या लोकांच्या उपचार आणि काळजीवर लाखो रुपये खर्च केले जातात; पण तोडगा निघत नाही. आरोग्य केवळ जनुकांवर किंवा काळजीवर अवलंबून नसते. आपल्या सवयींचाही यावर मोठा परिणाम होतो. त्यामुळे वर्तनातील बदल हे चमत्कारिक औषध ठरू शकते. वास्तविक जीवनात हे खूप कठीण आहे. सेलिब्रिटी, खेळाडू आणि सिनेस्टार वैयक्तिक प्रशिक्षकांची मदत घेतात; परंतु सामान्य लोक ते सोडवू शकत नाहीत. या समस्येवर मात करण्यासाठी, 'ओपन एआय' चे 'सीईओ' सॅम ऑल्टमन आणि हाईल्ह ग्लोबल सीईओ एरिक्रा हफिंग्टनने 'एआय'चे नवीन मंडिल आणण्यासाठी निधी देत आहेत. हे 'एआय' रिअल टाइम डेटाचे विश्लेषण करून सवयी बदलण्यास मदत करतील.

झोप, अन्न, दिनचर्या, तणाव व्यवस्थापन आणि सामाजिक व्यस्तता या पाच मूलभूत दैनंदिन वर्तनांचा आरोग्याच्या प्रत्येक पैलूवर खोलवर परिणाम होतो. हे बदलणे कठीण आहे; परंतु हायपर-पर्सनलायझेशनच्या सामर्थ्याचा उपयोग करून, 'एआय' या वर्तनांमध्ये लक्षणीय सुधारणा करू शकते. मधुमेहग्रस्त असणाऱ्यांना वैयक्तिक एआय प्रशिक्षक व्यस्त वेळापत्रकात रिअल टाइम आरोग्य डेटावर आधारित आहार आणि औषध घेण्याचा सल्ला देतील.

आवश्यकतेनुसार छोटी विश्रांती घेण्यास प्रोत्साहित करतील किंवा तातडीच्या खाण्यासाठी पाकतुती सांगतील. एवढेच नाही तर प्रत्येक व्यक्तीच्या वेगवेळ्या गरजांनुसार सूचना देतील. दुपारी तिसऱ्यांदा सोडा पिणाऱ्यांना रोखून लिंबू पाणी पिण्याची गरज पटवून देतील. जास्त जेवण झाले असेल, तर दहा मिनिटे चालण्याचा सल्ला देईल. या पमध्ये वर्तन बदलण्याच्या पद्धती, बायोमेट्रिक, लॅब आणि इतर वैद्यकीय डेटाचे प्रशिक्षण दिले जाईल. व्यक्ती, लहान-मोठ्या आठवणींमधील तात्पतणाव कमी करण्याचे प्रभावी मार्ग एकत्र करून एकात्मिक वैयक्तिक एआय प्रशिक्षक तयार केला जाईल. व्यक्तीची प्रत्येक छोटी-छोटी सवय लक्षात घेऊन रिअल टाईममध्ये अपडेट्स होतील. रुटीन खंडित होताच नवीन पर्यायही दाखवले जातील. दोघेही एआय हेल्थ कोचच्या प्रोजेक्टवर एकत्र काम करत आहेत. लवकरच ते प्च्या रूपात समोर येऊ शकते. ऑल्टमन यांच्या मते, गोपनीयता आणि कठोर सुरक्षा उपायांसह सामूहिक प्रयत्न आरोग्य सेवेत बदल घडवून आणू शकतात. त्यामुळे जगभरातील लाखो लोकांना फायदा होईल.

उच्च रक्तदाबावर आयुर्वेदिक उपचार

आयुर्वेदाच्या आधारे उच्च रक्तदाबाला कारणीभूत ठरतं. या वैद्यकशास्त्रात उच्च रक्तदाबाला 'रक्त कफ वृद्धी' असं म्हणतात. या दोन्ही दोषांचं असंतुलन दूर करून रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यावर आयुर्वेदाचा भर असतो. अनेकदा कफाच्या असंतुलनामुळेही हा विकार जडतो. उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यात बऱ्याच वनौषधी महत्त्वाची भूमिका बजावतात. विविध विकारांवरील उपचारांसाठी गोबुराचा वापर केला जातो. हेच औषध उच्च रक्तदाबाच्या समस्येवरही गुणकारी ठरतं. सर्पगंधा ही वनौषधीही मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. गुलकंद शरीर तसंच मेंदूला थंडावा देतं. याच्या सेवनाने मूड चांगला होतो शिवाय

ताणतणाव दूर होतो.

आयुर्वेदिक उपचार

व्याधीनिवारणार्थ आहारातल्या बदलांवरही आयुर्वेदाचा भर दिसून येतो. दोषांच्या संतुलनासाठी योग्य आहार गरजेचा असल्याने उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी पथ्यपाणी सांभाळावं. शाकाहाराने उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवता येतो. पार्सेली, कारलं, लसूण यांचा आहारात समावेश हवा. केळं, कलिंगड, पेरू आणि द्राक्ष ही फळं खायला हवी. पनीर, तूप आणि दुधाचं सेवन वाढवणं हा सुद्धा यावरचा प्रभावी उपाय आहे.

केंफेनमुळे रक्तदाब वाढा असल्यामुळे ते शक्यतो टाळावं. मीठ, डाळी आणि कडधान्यांचं प्रमाणही कमी हवं. लाल मांस आणि अंडी पूर्णपणे वर्ज्य करायला हवी. नियमित व्यायाम, योगा, मेडिटेशन यामुळे आराम मिळतो.

चेहरा धुताना...

आपण कुठे चुकतो?

चेहरा धुणं ही अत्यंत साधी वाटणारी क्रिया आहे. पण आपण त्यातही बऱ्याच चुका करतो. जवळपास प्रत्येक जण चुकीच्या पद्धतीने चेहरा धुतो, त्वचेची नीट काळजी घेत नाही असं तज्ज्ञ सांगतात. पण काही चुका टाळल्या तर त्वचा मुलायम आणि टवटवीत राहू शकते.

* झोपण्याआधी मेक अप काढून टाका. त्वचेलाही श्वास घ्यायचा असतो हे लक्षात ठेवा. मेक अप तसाच ठेवला तर त्वचेच्या समस्या उद्भवतात.
* रसायनयुक्त साबण त्वचेतला नैसर्गिक ओलावा काढून घेतो. यामुळे त्वचा निस्तेज दिसते. हे टाळण्यासाठी सौम्य साबण किंवा फेसवॉशचा वापर करा. रसायनयुक्त उत्पादनं टाळा.
* गरम पाण्याऐवजी कोमट पाण्याचा वापर करा. गरम पाण्यामुळे त्वचेचं नुकसान होतं.

* चेहरा धुताना बोटांचा वापर करा. तळव्याने चेहरा धुतल्याने त्वचेवर पुरळ उठू शकतं. बोटं चेहऱ्यावरून वर्तुळाकार फिरवा. एक ते दोन मिनिटं ही कृती करा.
* कोणत्याही उत्पादनाचा अतिवापर करू नका. फेसवॉश प्रमाणातच घ्या.
* बरेचदा चेहरा पुसण्यासाठी अंग पुसण्याचा टॉवेल वापरला जातो. पण यामुळे शरीरावरचे बॅक्टेरिया चेहऱ्यावर पसरू शकतात. म्हणूनच चेहरा पुसण्यासाठी मऊ फेस नॅपकीन किंवा स्वच्छ रुमाल वापरा.
* चेहरा जास्त वेळा धुतल्याने त्वचा कोरडी पडते.
* आठडयातून एक किंवा दोन वेळाच स्क्रबचा वापर करा.

जखमा बऱ्या करणारं ई-बॅंडेज

नवसंशोधन

अमेरिकेतल्या विस्कॉन्सिन-मॅडिसन विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी जखमा बऱ्या करण्यासाठी विद्युतप्रवाह निर्माण करणाऱ्या बॅंडेजची निर्मिती केली आहे. यामुळे जखमा अगदी कमी वेळेत बऱ्या होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ई-बॅंडेजने झाकलेली जखम अवघ्या तीन दिवसात बरी होईल. सर्वसाधारण बॅंडेज लावलेली हीच जखम बरी होण्यासाठी १२ दिवस लागू शकतात. ई-बॅंडेजची क्षमता वाढवण्यासाठी शास्त्रज्ञांनी ॲगावर चढवता येणारं नॅनोजनरेटरही तयार केलं आहे. उंदराच्या जखमेवर या बॅंडेजची चाचणी घेण्यात आली आहे. नजिकच्या भविष्यकाळात हे बॅंडेज अनेक प्रकारच्या जखमांवर हुकमी इलाज ठरू शकेल.

रूट कॅनल करताय?

दंतारोग्य

दातांच्या समस्यांवर विविध प्रकारचे उपचार केले जातात. रूट कॅनल ही अशीच एक उपचारपद्धती. दात ठिसूळ झाले असतील तर रूट कॅनलचा सल्ला दिला जातो. पण या प्रक्रियेची खरंच गरज आहे किंवा नाही हे जाणून घ्या. हे उपचार घेतल्यानंतर संसर्ग झालेले दात बरे होण्यास बराच वेळ लागू शकतो तसंच पुढचे काही दिवस अस्वस्थता, वेदना जाणवू शकतात. रूट कॅनल करताना स्वच्छतेचं भान राखलं नसेल तर पुन्हा संसर्ग होण्याचा धोका असतो. त्यामुळे पूर्ण विचाराअंती हे उपचार करून घेण्याचा निर्णय घ्या. तज्ज्ञ आणि अनुभवी दंततज्ज्ञाकडूनच हे उपचार करून घ्या.

कोरडेपणा कमी करण्यासाठी...

डोळ्यांचे आरोग्य

डोळ्यांचा कोरडेपणा, खाज येणं या हिवाळ्यातल्या समस्या आहेत. या काळात ह्वेतली आर्द्रता कमी झाल्याने लोकउष्ण वातावरणात राहणं पसंत करतात. घर आणि कार्यालयांमध्ये हिटर लावले जातात. यामुळेही डोळ्यांच्या समस्या उत्पन्न होतात. डोळ्यांचा कोरडेपणा टाळण्यासाठी भरपूर पाणी प्यायला हवं. हिटरची उष्णता थेट तोंडावर येऊ देऊ नये. थंडी बाकी हवीहवीशी वाटत असली तरी या काळात डोळ्यांची जपणूक करायला हवी

थंडीत काय खावं?

आजीबाईचा बटवा

थंडीत पोषक आहार आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या घटकांची गरज असते. म्हणून या दिवसात आहारात प्रथिनं, कर्बोदकं आणि आरोग्यदायी फॅट्सचा समावेश करायला हवा. या काळात मांसाहारीनी मासे खायला हवेत. प्रथिनं आणि ओमेगा ३ फॅटी ॲसिड्सचा हा खूप चांगला स्त्रोत आहे. यासोबत अंडी, सुका मेवा, विविध प्रकारच्या बिया, डाळी आणि सोयामधूनही शरीराला आवश्यक असणारे घटक मिळतात.

काय दुश्वितो जिभेचा रंग?

व्याधी विचार

जीभेच्या रंगातला छोटासा बदलही बरंच काही सांगून जात असतो. काही औषधांमुळेही जिभेचा रंग तात्पुरता बदलतो. त्यामुळे दात घासताना किंवा जीभ स्वच्छ करताना रंगाकडे नीट लक्ष देऊन गरजेनुसार डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

सर्वसाधारणपणे निरोगी व्यक्तीची जीभ फिकट गुलाबी रंगाची असते. त्यावर फिकट पांढऱ्या रंगाचा पट्टा असणं ही सर्वसामान्य बाब आहे. पण जीभ खूप पांढरी दिसत असेल तर शरीरात पाण्याची कमतरता असल्याचं समजावं. डिहायड्रेनमुळे हा परिणाम बघायला मिळतो. तोंडाची स्वच्छता नीट राखली जात नसल्याचाही हा संकेत असू शकतो. जीभेवरचा पांढरा पट्टा पनीच्या थरासारखा दिसत असेल तर ते ल्युकोप्लाकियाचं लक्षण असू शकतं. धूम्रपान हे याचं प्रमुख कारण आहे. फलूमुळेही जीभ पांढरी होते. नेमक्या निदानासाठी तज्ज्ञांकडून तपासणी करून घेणं योग्य ठरतं.

जिभेचा रंग खूपच फिकट दिसत असेल तर ते पोषक घटक तसंच जीवनसत्त्वांच्या अभावाचं द्योतक असू शकतं. सकस आहार घेऊन ही समस्या दूर करता येते. पिवळ्सर जीभ पचनक्रियेशी संबंधित दोष दर्शवते. पोट किंवा यकृताचे विकार असतील तर जीभेवर पिवळा पट्टा दिसतो. अर्थात हे लक्षण दिसत असले तर लगेच घाबरून जाण्याचं कारण नाही. तोंडाची अस्वच्छता अथवा काही औषधांमुळेही असं होऊ शकतं. कॉफीचं जास्त प्रमाणात सेवन करणाऱ्यांची जीभ फिकट राखाडी रंगाची दिसू शकते. कॅफेनमुळे असं होतं. धूम्रपानामुळेही जीभेवर राखाडी पट्टा पडतो. सतत धूम्रपान करणाऱ्या लोकांच्या जीभेवर कायमस्वरूपी राखाडी पट्टा तयार होतो. पुढील वेळा टाळण्यासाठी त्याची तपासणी करून घ्यायला हवी. जिभेवर बॅक्टेरिया असतील तौ काळी आणि केसाळ दिसते. अतिधूम्रपान करणाऱ्यांच्या जिभेवर असा केसाळ आणि काळपट पट्टा दिसू शकतो. फॉलिक ॲसिड तसंच बी १२ जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे जीभ लालभडक दिसते. बारकाईने निरीक्षण केलं तर जीभेवर लालसर फोडांची नकाशाप्रमाणे रचना झाल्याचं दिसून येतं. हृदयाशी संबंधित समस्या असणाऱ्यांची जीभ निळसर, जांभळी दिसते. हृदयाद्वारे रक्ताचा नीट पुरवठा होत नसेल किंवा रक्तात पुरेसा ऑक्सिजन नसेल तर जीभ निळसर दिसते. अशा वेळी तज्ज्ञांच्या सल्ल्याने तपासणी करून घ्यावी.

सेज टाय घालणे घातक!

जाणून घ्या

अनेक शाळांमध्ये टाय हा विद्यार्थ्यांच्या गणवेशाचा एक भाग आहे; मात्र घट्ट अगदी गळ्यालगत टाय घालणे विद्यार्थ्यांसाठी घातक ठरू शकते. मुलांना जवळपास सहा तास गळ्यात टाय बांधून ठेवणे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून घातक आहे. मुले जवळपास दिवसभर या गणवेशात असतात. त्यामुळे त्या टायचा त्यांच्या शरीरावर आणि आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. अभ्यासानुसार, टाय घातल्याने मेंदूला होणाऱ्या रक्तपुरवठा ७.५ टक्क्यांनी कमी होतो. एवढेच नव्हे, तर टाय घातल्याने डोळ्यांवर दबाव पडू शकतो. त्यात ग्लुकोमा आणि मोतिबिंदूचा धोका अधिक असतो.

वैज्ञानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, टाय घालणे हे सामाजिक स्वरूपात गळा आवळण्यासमानच आहे. 'न्यू सायंटिस्ट'मध्ये प्रकाशित झालेल्या अध्ययनात यावर अभ्यास करण्यात आला आणि टाय घालणे हे मेंदू आणि मेंदूमधील रक्तप्रवाहावर परिणाम करत असल्याचे समोर आले आहे. अभ्यासात एकूण ३० व्यक्तींचा समावेश करण्यात आला. यामध्ये १५ लोक दरदोज टाय घालणारे होते, तर १५ लोक टाय न घालणारे होते. एमआरआय तर्फे मेंदू स्कॅन करण्यात आला. कारण मेंदूतील रक्तप्रवाहाची माहिती मिळेल. संशोधनात असे दिसून आले, की टाय न घालणाऱ्या लोकांच्या तुलनेत टाय घालणाऱ्या लोकांच्या मेंदूतील रक्तप्रवाह हा ७.५ टक्क्यांनी कमी होता.

संशोधकांनी कमी रक्त प्रवाहाला संकुचित कॅरोटिड धमन्या जबाबदार असल्याचे सांगितले. टायच्या प्रेशरमुळे हृदयातील रक्त दूर गेल्याचे सांगण्यात आले आहे. संशोधन हे तीस व्यक्तींवर करण्यात आले असले, तरीही तसाच परिणाम विद्यार्थ्यांच्या मेंदूवर होऊ शकतो. त्यामुळे पालकांनी टाय बांधताना विशेष काळजी घ्यावी, टाय थोडा सैलसर बांधावी विद्यार्थ्यांच्या मानेला घट्ट आवळून टाय बांधू नये. तसेच मुलांना टायचा त्रास होत असल्यास शिक्षकांना निदर्शनास आणून द्यायला सांगावे.

पाच कोटी लोक एकटेपणाचे बळी!

आरोग्य चर्चा

आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येक व्यक्तीला एकमेकांच्या बरोबरीने राहायचे असते. एकीकडे एखाद्या व्यक्तीचे अनेक मित्र असूनही ती व्यक्ती त्याच्या आयुष्यात खूप एकटी असते. एकटेपणा हा एक मानसिक त्रास आहे. अशा व्यक्ती सहसा आतून असमाधानी असतात. २००४ मध्ये राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाने केलेल्या अभ्यासानुसार, भारतातील ४.९९ दशलक्ष लोक एकटे राहत होते आणि एकटेपणाने त्रस्त होते. आजकाल मोठ्या प्रमाणात गृहिणी एकटेपणाला बळी पडतात. आजकाल भारतात स्त्री असो की पुरुष; एकटेपणामुळे अनेक आजारांना बळी पडत आहेत. 'युनिव्हर्सिटी ऑफ वॉटरलू' येथील शेली बर्सिल यांनी केलेल्या संशोधनानुसार महिला त्यांचे एकटेपणा अधिक व्यक्त करतात. स्त्री आणि पुरुष दोघांच्याही मेंदूची रचना वेगळी असते आणि भावना वेगळ्या पद्धतीने व्यक्त करतात. पुरुष त्यांचे एकटेपणा आणि त्यांच्या भावना अधिक लपवतात, तर स्त्रिया ते लपवू शकत नाहीत.



एखाद्या माणसाला स्किझोफ्रेनियाची लक्षणे दिसली, तर तो त्याच्या आजाराबद्दल त्याच्या मित्रांना सांगतो, दुसरीकडे, महिलांना असा आजार झाल्याचे निदान झाले, तर त्यांना आजूबाजूच्या लोकांना सांगणे आवडत नाही. तिला पटकन कोणाशीही संलग्न व्हायला आवडत नाही. ब्रेकअप किंवा लग्नानंतर सुरुवातीच्या दिवसांमध्ये महिलांना खूप एकटेपणा जाणवतो. पुरुषांना हे सुरुवातीला नाही तर नंतर कळते. पुरुष अनेकदा त्यांच्या भावना दाबणे पसंत करतात. एकटेपणामुळे लोक अनेकदा उदास होतात. संशोधकाच्या मते, हे झोपेच्या कमतरतेमुळे असू शकते आणि नंतर लोक नैराश्याचे बळी होतात. एकटेपणाचा सामना करण्यासाठी कुटुंब, मित्र आणि नातेवाइकांशी सामाजिक संबंध सुरू करा. लक्ष सर्जनशील गोष्टीवर केंद्रित करा. समविचारी लोकांना भेटा. चांगले पुस्तक वाचा.

कर्करोगाचा धोका



जगभरात कर्करोगाचा धोका वाढत असून विविध प्रकारच्या कर्करोगामुळे दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो. फुफ्फुसाचा कर्करोग हे पुरुषांमध्ये सर्वाधिक नोंदवलेले कर्करोग आहेत, तर स्त्रियांमध्ये स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोगाची सर्वाधिक नोंद झाली आहे. एका संशोधनात असे दिसून आले, की अनुवांशिकतेमुळे पुरुषांना स्त्रियांपेक्षा कर्करोग होण्याची शक्यता जास्त असते.

धूम्रपान आणि अल्कोहोल सेवन, बॉडी मास इंडेक्स (बीएमआय), शारीरिक ॲक्टीव्हीटी, आहार आणि वैद्यकीय इतिहास हे कर्करोगासाठी मुख्य जोखीम घटक असू शकतात.

दखल

एका अभ्यासानुसार, बहुतेक प्रकारचे कर्करोग स्त्रियांपेक्षा पुरुषांमध्ये अधिक वेळा विकसित होतात. खराब जीवनशैली आणि आहारातील चुकीच्या पद्धतीमुळे कर्करोगाचा धोका वाढताना दिसत आहे.

कर्करोगाचा धोका आणि त्याचे गंभीर स्वरूप पुरुषांमध्ये जास्त असल्याचे दिसून आल्याचे संशोधकांनी स्पष्ट केले. पुरुषांमध्ये यकृत, पित्त नलिका, त्वचा, गुदाशय आणि फुफ्फुसाच्या कर्करोगाचे प्रमाण जास्त आहे. पुरुषांमधील इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉनसारख्या हार्मोन्सच्या असंतुलनामुळे कर्करोगाचा धोका जास्त किंवा कमी असू शकतो. निरोगी जीवनशैली राखणे, सकस आणि पौष्टिक आहार घेणे, नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचा धोका टाळण्यासाठी एक लस उपलब्ध आहे. तिच्या मदतीने कर्करोगाचा धोका बऱ्याच प्रमाणात कमी केला जाऊ शकतो.

'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा '३' सावडेी मे विराजमान है ।

मोक्ष महलचा तिसरा दरवाजा 'तप' आहे. जैनधर्म हा त्याग प्रधान धर्म आहे. परंतु विश्वाच्या सगळ्या धर्मांमध्ये 'व्रता'चे महत्व सांगितले आहे. परमात्मा प्रभु महावीर ने दशवैकालिक सुत्रात म्हटले आहे, कि अहिंसा, संयम आणि व्रत हे मंगलमय उत्कृष्ट धर्म सांगितले आहे. कारण व्रत (तप) शरीर, बुद्धि, मन आणि आत्माला मंगलमय बनवतो. व्रताचे दरवाजे मन बुद्धि आणि आत्माचा विकास आहे. अशुद्ध कर्माचा शोषण करत आहे. तप, कर्म क्षय करण्याचे साधन आहे.

उत्तराध्याय सुत्रात (२९) एकोणतीस वा अध्ययन यात गौतम स्वामी ने परमात्माना विचारले भन्ते, व्रतानी जीवला काय लाभ होतो? भगवान नी सांगितले हे गौतम व्रतामध्ये बांधले तर कर्माचे क्षय होते.

व्रत एक प्रयोगशाळा आहे. जसे वेगवेगळे प्रयोग करून सिद्ध केले जाते, तसेच व्रत आहे. जे जाणत आहे तोच पिळत आहे. जसे :– (आटा) पिठाला तापवतो तेव्हाच फुलके (रोटी) बनवली जाते. (आम) आंबा झाडावर तापतो मगच तो पिकतो. सोनं सुद्धा अगीत तापतो तेव्हाच तयार होतो. त्याचप्रकारे आत्माला तापवले तर परमात्मा बनत आहे. साधनाने तेजस्वीता येते. विचार केला तर जीवनात कित्तीही अपवित्र का असेना परंतु व्रताच्या अगीत पडले की कुंदन बनले जाते. अंतगड दसांक सुत्रात वर्णन केला कि प्रत्येक दिवस सहा पुरुष आणि एक स्त्री ची हत्या करणारा हत्यारा अर्जुन माली त्याने सहा महिन्यात किती कर्मेच्या बंधनात अडकला. परंतु परमात्मा महावीरच्या साप्निध्यात संन्यास व्रत घेऊन (बेले बेले) दोन दोन दिवस निरंकार व्रताची साधना आरंभ केली आणि (६) सहा महिन्यात उत्कृष्ट व्रत साधनाने कर्माचा क्षय मोक्षाला प्राप्त केले. पापी आत्मा पवित्र आत्मा बनली.

सनतकुमार चक्रवर्तीनी संन्यास घेतल्यानंतर (७००) सातशे वर्ष पर्यंत संयमचा पालन किंवा त्या दरम्यान व्रत साधना करून अनेक सिद्धी प्राप्त करून व्रत जीवनला महान करून केले देतो.

सनतकुमार साधना करून अनेक सिद्धीया प्राप्त केले.

– सौ. सविता चोरडिया

आडतेबाजार मर्चंटस असोसिएशनच्या तथाकथित विश्वस्तांकडून बेकायदेशीररित्या न्यासावर कायम ताबा मिळवण्याचा प्रयत्न

नगर – दि अहमदनगर आडतेबाजार मर्चंटस असोसिएशन ही सार्वजनिक विश्वस्त संस्था असून सदरील संस्था ही १९० वर्षे जुनी संस्था आहे. सदरील संस्थेस कोणत्याही स्वरुपाची लिखित घटना नाही, असे कारण पुढे करुन सध्या तथाकथित विश्वस्त मंडळात कार्यरत असलेल्या विश्वस्तांनी अहमदनगर येथील सहधर्मदाय आयुक्त यांच्याकडे अर्ज क्रमांक ११/२०१७ सदर न्यासाच्या संपूर्ण सभासदांना व तत्कालिन विश्वस्त मंडळास कुठल्याही प्रकारे विश्वासात न घेता व अंधारात ठेवून सदरची चुकीची योजना न्यासाकरिता मंजूर करुन घेतलेली आहे. सदरील योजनेस न्यासाचे अध्यक्ष राजेंद्र चोपडा यांनी दीपावर सहआयुक्त पुणे यांच्याकडे आव्हान दिलेले असून सदरील याचिकेमध्ये न्यासाचे तथाकथित विश्वस्त मंडळ हे हजर झालेले आहेत. सदरील आपिलाचे कामकाज वरिष्ठ न्यायालयासमोर प्रलंबित आहे. सदरील न्यायालयास घटनेस आव्हान देण्यात आलेले असून सदरील घटना ही अंतिमतः वरिष्ठ न्यायालयाने मंजुर केलेली नाही, याची पूर्ण माहिती व जाणीव सध्या न्यासाचा कारभार बेकायदेशीररित्या पाहत असलेल्या विश्वस्त मंडळास आहे. अशा परिस्थितीत सध्या चालू असलेल्या बेकायदेशीर विश्वस्त मंडळाच्या कामकाजास सभासदांची मान्यता आहे असे दाखवून न्यायालयाची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने न्यासाच्या तथाकथित विश्वस्त मंडळाने २८ जुलै रोजी इंद्रप्रस्थ मंगल कार्यालयामध्ये न्यासाची वार्षिक सभा बोलविल्याचा बनाव तयार केलेला असल्याचे समजते अशी माहिती असोसिएशनचे माजी सेक्रेटरी तथा विद्यमान सभासद किशोर पितळे यांनी दिली.

किशोर पितळे

किशोर पितळे यांनी म्हटले आहे की, सदरील माहितीवरून सभासदांची कुठल्याही प्रकारची दिशाभूल होवू तसेच न्यासाच्या हितापर्यंत विरोधात न्यासाच्या सभासदांना व विश्वस्त मंडळाला अंधारात ठेवून बेकायदेशीररित्या व चुकीच्या पध्दतीने मंजूर करून घेतलेल्या घटनेचे प्रमाणीकरण करण्याच्या उद्देशाने बोलवलेली सभा ही पूर्णपणे चुकीची व बेकायदेशीर असून त्यातून न्यासाच्या हितावर दूरगामी विपरित परिणाम होणार आहेत. सर्व सभासदांना या गोष्टीची सखोल माहिती व्हावी म्हणून सदर माहिती देण्यात येत आहे.

न्यासाच्या सहधर्मदाय आयुक्त, अहमदनगर यांनी मंजूर केलेल्या घटनेनुसार न्यासास ५००१ रुपये वर्णी देणाऱ्या सभासदास कायमस्वरुपी सदस्य म्हणून संबोधले जाईल व त्यास वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहता येईल अशा पध्दतीची तरतूद केलेली आहे. न्यासाचे कायमस्वरुपी सभासदत्व मिळवण्यासाठी संबंधित सभासदाने विश्वस्त मंडळाकडे अर्ज दाखल करुन विश्वस्त मंडळाने तो अर्ज न्यासाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करुन घेण्याची देखिल अट सदरील योजनेमध्ये नमूद करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता सदरील न्यासाचे जे काही सध्याचे विश्वस्त मंडळ आहे, त्यांनी काही सभासदांकडून ५ हजार रुपयाप्रमाणे पैसे गोळा केले आहेत, अशीही खात्रीलायक माहिती आहे. परंतु सदरील सभासदांचे अर्ज हे कुठल्याही वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आलेले नाहीत. तसेच न्यासाचे विश्वस्त मंडळ म्हणून काम पाहत असणाऱ्या सभासदांची विश्वस्त म्हणून सदरील योजनेप्रमाणे निधारित केलेली अर्हता देखील धारण केलेली नाही. तरी अशा परिस्थितीमध्ये स्वतःस विश्वस्त मंडळ म्हणवून घेणाऱ्या सभासदांच्या बेकायदेशीर कृत्यास सभासदांची सहमती आहे अशा पध्दतीचा बनाव घडविण्याच्या दृष्टीने प्रसृतुत्वी सभा बोलविण्यात आलेली आहे. सदरील सभेमध्ये सभासदांनी न्यासाच्या व स्वतःच्या वैयक्तिक हिताच्या दृष्टीकोनातून योग्य तो विचार करून न्यासाच्या तथाकथित बोगस विश्वस्त मंडळास बेकायदेशीर कृत्य करण्यापासून रोखावे, असे आवाहन किशोर पितळे यांनी केले आहे.

नगर अर्बन बँक प्रकरणातील मागी संचालक कमलेश गांधी यांना अटकपूर्व जामीन मंजूर

नगर – नगर अर्बन को–ऑपरेटिव्ह मल्टीस्टेट बँकेच्या गैरव्यवहार प्रकरणातील फॉरेन्सिक ऑडीट मधील आरोपी बँकेचे माजी संचालक कमलेश हस्तीमल गांधी (रा. शेवगाव) यांना औरंगाबाद उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. औरंगाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार दिघे यांनी २५ जुलैला यावर सुनावणी करत हा आदेश दिला असल्याची माहिती कमलेश गांधी यांचे वकील अॅड. नितीन गवारे यांनी दिली.

अर्बन बँकेत झालेल्या गैरव्यवहारचे फॉरेन्सिक ऑडीटमध्ये बँकेचे माजी संचालक कमलेश गांधी यांच्यावर बँकेच्या कर्जदाराकडून ४ लाख रुपयांची रक्कम घेतल्याचा आरोप केला होता. तसेच कमलेश गांधी यांना २०१४ ते १९ या पाच वर्षाच्या काळातील संचालक असल्याचे दाखवून या काळात झालेल्या कर्ज प्रकरणांची जबाबदारी त्यांच्यावर टाकून आरोपी करण्यात आले होते.

याबबत आरोपी कमलेश गांधी यांनी एप्रिल महिन्यात जिल्हा न्यायालयात दाद मागून अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला. मात्र जिल्हा न्यायालयात त्यांचा जामीन फेटाळण्यात आला. त्यानंतर गांधी यांनी औरंगाबाद उच्च न्यायालयात दाद मागून अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला. त्यावर आरोपीचे वकील अॅड. नितीन गवारे यांनी युक्तिवाद केला. कमलेश गांधी हे १ डिसेंबर २०२१ ला नगर अर्बन बँकेचे संचालक झाले. ते २०१४ ते १९ या पाच वर्षाच्या काळात बँकेचे संचालक नव्हते हे त्यांनी सिद्ध केले. तसेच त्या काळात एकही कर्ज प्रकरण त्यांनी मंजूर केले नाही. बँकेचे २००९ पासूनचे कर्जदार असलेले आळेफाटा येथील रोनक एंटरप्राइझेस यांच्याकडून ४ लाख रुपयांची रक्कम कमलेश गांधी यांनी घेतल्याचा आरोप फॉरेन्सिक ऑडिट मध्ये करण्यात आला होता. त्यावरही अॅड.नितीन गवारे यांनी युक्तिवाद करत सांगितले की, कर्जदार रोनक एंटरप्राइझेसचे संचालक व आरोपी गांधी हे एकमेकांचे जवळचे नातेवाईक आहेत. त्यांच्यात वारंवार आर्थिक व्यवहार व पैशाची उदार उसनवार होत असे. आरोपीच्या खात्यात कर्जदाराकडून ज्या काळात ४ लाख रुपये आले त्या काळातल आरोपी गांधी हे बँकेचे संचालक नव्हते. फॉरेन्सिक ऑडिट मध्ये आरोपी त्याकाळात संचालक असल्याचे दाखवण्यात आले होते. याप्रकरणी कमलेश गांधी यांना खोटया प्रकरणात अडवण्यात आले आहे, हे पुराव्यानिशी अॅड. गवारे यांनी सिद्ध केले.

या प्रकरणी औरंगाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार दिघे यांनी २५ जुलैला सुनावणी देत आरोपी कमलेश गांधी यांना बिनशर्त अटकपूर्व जमीन मंजूर केला आहे.

याप्रकणी अॅड. नितीन गवारे यांना अॅड.झिया फारुकी, अॅड. संजय गायकवाड, अॅड. विजय बेहेर व अॅड. जयप्रकाश देशमुख यांनी सहकार्य केले

चिकन, मटण, फिश वेस्टचा कचरा टाकून सिना नदीपात्रात प्रदूषण केले जात आहे. (छाया–महावीर पोखरणा)

चिकन, मटण, फिश वेस्टचा कचरा सिना नदीच्या पात्रात टाकून प्रदूषण

नगर – शहरातील मल्हार चौक, टिळक रोड येथील मांस विक्रेते त्यांच्या दुकानातील मटण, मांसचे टाकावू अवशेषचा वेस्ट कचरा तसेच त्यांचे निघालेले रक्त रात्रीच्या वेळी मोठ्या ड्रम मध्ये आणून सीना नदीच्या लोखंडी पूल तसेच काटवन खंडोबा पात्रात सर्रासपणे टाकत आहेत. परिणामी नदीचे पाणी प्रदूषीत होत आहे. शासन आणि प्रशासनातर्फे एकीकडे नदी स्वच्छता मोहीम राबविली जात आहे. त्यावर कोटयवधी रुपयांचा निधी खर्च केला जात आहे. एवढेच नव्हे तर व्यापकस्तरावर स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. मात्र दुसरीकडे स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षीतपणामुळे नदी प्रदूषीत केली जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष व्याप्त आहे. केवळ मांस विक्रेतेच नव्हे तर इतरही काही बेजाबबदार नागरिक तसेच काही केटरिंग व्यावसायिक शिझक राहिलेले अन्न तसेच केरकचरा नदीच्या पात्रात टाकत असल्याची माहिती आहे. परिणामी नदीचे पाणी प्रदूषीत होत आहे. शिवाय या परिसरात दुर्गंधी पसरत आहे.

तरी महापालिका तसेच प्रदूषण नियंत्रण विभागाने यासंबंधी कडक उपाययोजना करावी, अशी मागणी येथील नागरिक करत आहेत.

आरुष बेडेकरची सराफ दालनास भेट

कलर्स मराठी वाहीनीवर योग योगेश्वर जयशंकर या मालीकेतील शंकर महाराजांची भुमिका साकरणारे चि. आरुष प्रसाद बेडेकर यांनी अशोक दातारय नांदूरकर सराफ या दालनास भेट दिली असता त्याचे कौतुक करतांना महेंद्र नांदूरकर, जितेंद्र नांदूरकर, प्रशांत डहाळे, निरज राठौर, प्रविण नह्या, श्रवण शर्मा.

मंगल भक्त सेवा मंडळाचे अध्यक्ष, एमआयडीसीच्या मंगल दत्तक्षेत्राचे प्रमुख राजाभाऊ कोठारी उर्फ स्वामी विश्वेश्वर महाराज यांच्या वतीन भाग्यविधाता कर्मयोगी पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

भाग्यविधाता कर्मयोगी पुस्तकाचे प्रकाशन

नगर – प्रार्थना समाजच्या अध्यक्षा शशिकला बागडे लिखित मंगल भक्त सेवा मंडळाचे अध्यक्ष, एमआयडीसीच्या मंगल दत्तक्षेत्राचे प्रमुख राजाभाऊ कोठारी उर्फ स्वामी विश्वेश्वर महाराज यांच्या वतीन 'भाग्यविधाता कर्मयोगी' पुस्तकाचे प्रकाशन जेष्ठ सेवेकरी अशोक लूनावत, दिलीप खोले, संजय उदावंत, राजू क्षीरसागर, नरेश शहा, जयंत पारेख आदींच्या हस्ते झाले

पुस्तकामध्ये एफ ७० येथील औदुंबर वृक्षाचे महत्व, राजाभाऊ कोठारी यांना झालेली शंकर महाराजांची कृपादृष्टी, दत्त महाराज कृपादृष्टी व दर्शन कसे झाले, अध्यात्मिक कार्य कसे सुरु झाले व सध्याच्या एमआयडीसीतील मंगल दत्त क्षेत्र विषयीची माहिती या पुस्तकात आहे.

यावियाी शशिकला बागडे लिहितात कि राजाभाऊ एक राजयोगी म्हटल तर वावग होणार नही. त्यांचे सर्व कार्य राजस आहे. आयुष्याची सुरवात जरी खोडकर म्हणून झाली, तरी आजच त्यांचे व्यक्तिमत्त्व पाहिल्यावर आधुनीक ऋषीतूल्य जीवन जगतात बघणे हे माझ भाग्य मला वाटते.

व्यसनमुक्तीचा नारा करण्यापेक्षा प्रत्यक्ष एखाद्या शिल्पाला साज चढवावा तसे त्यांनी प्रत्येक जीवाला जगण्याच अर्थ सांगितला. आज समाजीकडे नैराश्य वृत्तीने जगणे पाहण्यात येते. त्यामुळे गुन्हे होतात. आत्महत्या, अस समाज निर्मिती भासते. अशा ह्या अंधार–युगाचा अस्त होण्यासाठी जणू श्री अवधूत शंकर बाबांनी राजेश्वरा हाती हा दिप–ज्योतिचा प्रकाश दिला. त्यामुळे व्यसन मुक्तीचा राजमार्ग जगाभाऊनी–दिला. सत्य–युगाला सुरुवात झाली, असे माझे मत आहे. त्यात त्यांच्या कुटुंबांचे खूपच सहकार्य आहे.

निस्वार्थ भावनेने सेवा देत विश्वास निर्माण करणारी रोटरी ही एकमेव संस्था

राजू सुब्रमनिअन यांचे प्रतिपादन

नगर – निस्वार्थ भावनेने सेवा देत विश्वास निर्माण करणारी रोटरी ही एकमेव संस्था आहे. या संस्थे सारखे कार्य कोणाचेच नाहीये. त्यामुळे भारतात क्लबच्या सदस्यांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. लहान लहान सामाजिक उपक्रमांचाही मोठा व चांगला परिणाम होत आहे. त्यामुळे जास्तीत जास्त सामाजिक कामे व मदत करत रहा. रोटरी ही भविष्य निर्माण करणारी संस्था आहे. रोटरी क्लब या वर्षी मॅजिक थीमवर काम करणार आहे. या थीमचा लाभ घेवून नव्या पदाधिकाऱ्यांनी अधिक चांगले काम करावे, असे प्रतिपादन रोटरी क्लबचे इंटरनॅशनल डायरेक्टर राजू सुब्रमनिअन यांनी केले.

नागरच्या रोटरी मिडटाउन क्लबचे नूतन अध्यक्ष अजय पिसुटे व सचिव मर्लिन एलिशा यांनी रोटरी क्लबचे इंटरनॅशनल डायरेक्टर राजू सुब्रमनिअनयांच्या उपस्थितीत आपला पदभार स्वीकारला. यावेळी मावळत्या अध्यक्षा मधुर झावरे, मावळते सचिव अमोल खोले, माजी प्रांतपाल प्रमोद पारीख व सहाय्यक प्रांतपाल प्रसन्न खाजगीवाले आदी.

रोटरी क्लब मिडटाउनच्या पदाधिकाऱ्यांचे उत्साहात पदग्रहण

नगरच्या रोटरी मिडटाउन क्लबच्या पदग्रहण समारंभात राजू सुब्रमनिअन यांनी मार्गदर्शन केल. मिडटाउन क्लबचे नूतन अध्यक्ष अजय पिसुटे व सचिव मर्लिन एलिशा यांनी मावळत्या अध्यक्षा मधुर झावरे व मावळते सचिव अमोल खोले यांच्या कडून पदभार स्वीकारला. यावेळी माजी प्रांतपाल प्रमोद पारीख, सहाय्यक प्रांतपाल प्रसन्न खाजगीवाले यांच्यासह मिडटाउन क्लबचे नूतन पदाधिकारी सदस्य, शहरातील इतर रोटरी क्लबचे पदाधिकारी व विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

क्लबचे नूतन अध्यक्ष अजय पिसुटे म्हणाले, समजाचे अनेक उपकार आपल्यावर असतात. ते फेडण्यासाठी सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देत आहे. सुदृढ समाज निर्मितीसाठी इतरांसाठी जगाचे ही आईने दिलेली शिकवण कायम लक्षात ठेवून काम करत आहे. सामाजिक कार्यात पुढे असलेल्या रोटरी मिडटाउन क्लबच्या अध्यक्षपदाची धुरा माझ्यावर टाकून सदस्यांनी मोठ विश्वास व्यक्त केला आहे. अध्यक्षपद सांभाळताना या वर्षात सर्वात जास्त सामाजिक उपक्रम व मदत कार्य सर्वांच्या साथीने करणार आहे.

यावेळी क्लबच्या मावळत्या अध्यक्षा मधुरा झावरे व सचिव अमोल खोले यांनी गेल्या वर्षभर केलेल्या सामाजिक, शैक्षणीक, आरोग्यविषयक उपक्रमांचा धावता आढावा घेत अहवाल सादर केला. प्रसन्न खाजगीवाले यांनी प्रांतपालांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन केले. प्रमोद पारीख यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. क्लबच्या सचिव मर्लिन एलिशा यांनी आभार मानले. या कार्यक्रमात सर्व नव नियुक्त पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारला. तसेच नव्या सदस्यांचे स्वागत करण्यात आले. प्रा. प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

हुतात्मा स्मारकात कारगिलचा रौप्य महोत्सवी विजय दिवस साजरा

नगर – देशभक्तीच्या गीतांनी प्रफुल्लीत झालेल्या वातवरणात शहरातील हुतात्मा स्मारकात शुक्रवारी (दि.२६ जुलै) कारगिलचा रौप्य महोत्सवी विजय दिवस साजरा करण्यात आला. भारत माता की जय..., वंदे मातरम..., शहीद जवान अमर रहे!... च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणला. लायन्स क्लब ऑफ अहमदनगर, लिओ क्लब ऑफ अहमदनगर व मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र वाहून व उपस्थितांनी मेणबत्या प्रज्वलित करुन कारगिलमध्ये शहीद झालेल्या जवानांना श्रध्दांजली वाहिली. यावेळी लायन्स क्लबच्या अध्यक्षा डॉ. अनघा पारगावकर, सचिव डॉ. सिमरन वधवा, खजिनदार अंजली कुलकर्णी, लिओ क्लबच्या अध्यक्षा रिद्धिमा गुंदेचा, खजिनदारपदी हर्षवर्धन बोरुडे, दिशा तलवार, ओम भंडारी, विजय कुलकर्णी, डॉ. संजय असनानी, प्रशांत मुनोत, कमलेश भंडारी, पुरुषोत्तम झंवर, प्रणिता भंडारी, जालिंदर बोरुडे, ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, किरण भंडारी, यशवंत तोडमल, जिजामाता कन्या निवासच्या संचालिका ज्योती मोकळ, डॉ. प्रिया मुनोत, अर्चना माणकेश्वर आदींसह लायन्स व लिओ क्लबचे सदस्य, रयतच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळा संचलित जिजामाता कन्या निवासच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

भारत माता की जय..., शहीद जवान अमर रहे!... च्या घोषणांनी परिसर दणाणला

हुतात्मा स्मारकात कारगिलच्या रौप्य महोत्सवी विजय दिवस साजरा करताना आ. संग्राम जगताप यांनी हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करुन मेणबत्या प्रज्वलित करताना. समवेत डॉ. अनघा पारगावकर, डॉ. सिमरन वधवा, अंजली कुलकर्णी, रिद्धिमा गुंदेचा आदी.

प्रास्ताविकात रिद्धिमा गुंदेचा म्हणाल्या की, नागरिक व युवकांनी मनात देशभक्ती प्रज्वलित ठेऊन जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. जवानांचा त्याग, समर्पण व बलिदान न विसरण्यासारखे आहे. नागरिक व युवकांनी मनात देशभक्ती प्रज्वलित ठेऊन देश कार्यात योगदान देण्याचे त्यांनी आवाहन केले.

स्वागत मन्सूर शेख यांनी केले. जालिंदर बोरुडे यांनी कारगिल विजय दिवस दरवर्षी साजरा केला जातो. या कार्यक्रमातून जवानांप्रति कृतज्ञता व शहिदांना मानवंदना देऊन समाजात देशभक्ती जागृती होत असल्याचे स्पष्ट केले.

डॉ. अनघा पारगावकर म्हणाल्या की, पाकिस्तान या शत्रुराष्ट्रान मैत्री भेट सुरू असताना, भारतात सैन्य व अतिरेकी पाठविले. आपल्या देशातील सिमा भाग बळकाविण्यासाठी कारगिल युध्द सुरु झाले. भारतीय जवानांनी विजय मिळवून पाकिस्तानी सैन्याला पिटाळून लावले. या युध्दात अनेकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली.

सीमेवर जवान तैनात असल्यामुळेच आपण देशांमध्ये रण–उत्सव समारंभ सुरक्षित साजरे करीत आहोत, याची प्रत्येकाने जाणीव ठेवणे गरजेचे आहे. या जवानांप्रती आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी रक्षा बंधनला लायन्सच्या माध्यमातून राखी पाठवण्याचा उपक्रम राबविण्यात योगदान सेवविली त्यांनी गतीविली.

जिजामाता कन्या निवास (वस्तीगृह) मधील साक्षी खरात, अर्चना गायकवाड व शांती मुथा या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीत सादर केली. उपस्थितांसह विद्यार्थ्यांनी मेणबत्या प्रज्वलीत करुन वीर जवानांना नमन केले. तर पाहुण्यांच्या हस्ते पुष्पचक्र हुतात्मा स्मारकावर अर्पण करुन कारगिल मधील शहिदांना श्रध्दांजली वाहण्यात आली. सूत्रसंचालन हरजितसिंह वधवा यांनी केले. आभार संतोष माणकेश्वर यांनी मानले.

अहमदनगर महानगरपालिका नोंदणीकृत ठेकेदार संघटनेचे नूतन अध्यक्ष सचिन लोटके यांचा सत्कार करताना आंनद पुंड. समवेत नूतन उपाध्यक्ष शोएब शेख, ओमकार देशमुख, नाजीर शेख यांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. समवेत ठेकेदार संघटनेचे सभासद.

अहमदनगर महानगरपालिका नोंदणीकृत ठेकेदार संघटनेच्या अध्यक्षपदी सचिन लोटके

उपाध्यक्षपदी शोएब शेख, ओमकार देशमुख, नाजीर शेख यांची एकमताने निवड

नगर – अहमदनगर महानगरपालिका नोंदणीकृत ठेकेदार संघटनेची बैठक झाली. या बैठकीत अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा ठराव शाकीर शेख यांनी मांडून सर्व ठेकेदारांनी एकमताने मंजुरी देत ठराव मंजूर करून अध्यक्षपदी सचिन लोटके व उपाध्यक्षपदी शोएब शेख, ओमकार देशमुख, नाजीर शेख यांची निवड करण्यात आली.

यावेळी अहमदनगर महानगरपालिका नोंदणीकृत ठेकेदार संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी राजेंद्र लोणकर, आनंद पुंड, शाकीर शेख, अनुप शेट, अभिजीत काळे, मोईन खान, नितीन फुलसौंदर, अक्रम शेख, इमरान शेख, नंदू धाडगे, भैय्या पठाण, कुलदीप भिंगारदिवे, प्रसाद चनोडिया, महेश व्यापारी, निकेतन लोटके, महेश लोटके, शहानवाज शेख, मोसिम शेख, झहीर शेख, रोहित, राहुल पडोळे, तारीख शेख, सुमित जायभाय, अक्षय, दीपक कावळे, अमोल नांगरे, शाहरुख शेख, प्रसाद साळी, विकास शेख, जावेद राजे, आकिस सय्यद, अभिजीत घिया आदिसह ठेकेदार उपस्थित होते.

यावेळी नूतन ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष सचिन लोटके म्हणाले की, अहमदनगर महानगरपालिका नोंदणीकृत ठेकेदार संघटनेच्या ठेकेदारांना अनेक अडचणी येतात त्यामध्ये ठेकेदारांना वेळेवर बिल जदा होत नाही व बयाना रक्कम मिळणेबाबत सेक्युरिटी डिपॉझिट लायब्ररी प्रिंट कमी करणे छाननी समिती लवकर करणे अशा विविध अडीअडचणींना सामना करावा लागत आहे. त्यामुळे पुढील काळात संघटनेच्या मार्फत ठेकेदारांना येणारी अडचण सोडवण्यासाठी अध्यक्ष या नात्याने कटिबद्ध राहणार असल्याची भावना व्यक्त केली

2 BHK फ्लॅट भाड्याने देणे
(बँक कर्मचारी, वडीलवाले)
धर्मादिकारी मळा, सावेडी,अ.नगर
9921082664

स्वतंत्र घर विकणे आहे
भिस्तबाग, सावेडी, अ.नगर येथील
9503235047

प्लॉट विकणे आहे
गावडेमळा, पाईपलाईनरोड, प्राईम लोकेशनमध्ये (पूर्वमुखी) १४५० स्क्वे.फूट प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
9834637850

फ्लॅट विकणे
पॉश एरियामध्ये १ रूम किचन फ्लॅट विकणे आहे. आशीर्वाद कॉलनी, हॉटेल ओबेरॉयसमोर.
8966753351

ट्विन बंगलो विकणे आहे
कुशाबानगर भिस्तबाग रोड, सावेडी (एजंट क्षमस्व)
9209279202

बेसमेंट दुकान विकणे आहे
भिडे हॉस्पिटलसमोर, सावेडी नाका,अ.नगर
9209279202

७५० स्क्वे.फूट गाळा भाड्याने देणे आहे.
सागर हॉटेलसमोर, समर पॅलेस येथे पाईपलाईन रोडच्च ५५० स्क्वे फूट गाळा भाड्याने देणे आहे. स्वतंत्र पार्किंग सुविधा.
8888428141

दुकान भाड्याने देणे आहे
रक्षाबंधनाच्या स्टॉल/कपड्यांचा सेलसाठी उपयुक्त प्रशस्त दुकान.
9404904831

घर भाड्याने देणे
सर्व्हे नं. १३, प्लॉट नं. ११, संत किसनगिरी नगर, भिस्तबाग, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर येथील पहिल्या मजल्यावरील 1BHK घर भाड्याने देणे आहे.
संपर्क:- 7385668115
9511803799

वधु विषयक
वधु-२६, ५.३,गोरी, १२ वी,बी.कॉम.,हिंदु-पदशाली, आई-वडील नाहीत. कापडाचे दुकान, शेती ३ एकर, मुलीकरिता हिंदु सर्व जातीय, सामान्य वर चालेल.
8446068427
7517057842

आता वजन कमी करणे किंवा वाढवणे झाले सोपे
तुमच्या घरातून दररोज व्यायाम करा.
यासाठी मोफत मार्गदर्शन.
अंबादास इंगळे
Ex Army Fitness Expert
मो. 8888352220
8888362220

अ.नगर कापड बाजार येथे
शॉप्स उपलब्ध
ऑफर मर्यादित कालावधीसाठी, सर्व सुविधायुक्त, सी.सी.टि.व्ही. कॅमेरे, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच वॉशरूमची सुविधा
अभी नही तो.. कभी नही..
– संपर्क –
9270570699

पाहिजेत
अ.नगर सक्कर चौक येथील एका हॉटेलमध्ये
* वेटर : २
* कॅप्टन : २
* किचन हेल्पर : २
7276477600

रेडिमेड कापड दुकानाकरिता त्वरित पाहिजेत
सेल्समन : ३
सेल्सगर्ल : ३
ख्रिस्तगल्ली, कैलास डेअरीसमोर,अ.नगर
9764111117

पाहिजेत

वसुली अधिकारी	पोस्ट ग्रॅज्युएट/एम.एस.डब्ल्यू उत्तम संवाद कौशल्य,मार्केटिंग स्कील	अहमदनगर कार्यालय
मार्केटींग ऑफिसर	B.B.A उत्तम संवाद कौशल्य,मार्केटिंग स्कील	जागा 5

चैतन्य महिला बचत गटाची सहकारी पतसंस्था
वरद टॉवर,बंगाल चौकी, माळीवाडा,अ.नगर. मो.9552077888
इच्छुक उमेदवारांनी chaitanyaorg20@gmail.com या ई-मेलवर आपला बायो-डाटा पाठवावा.

पाहिजेत
कालिटी कन्ट्रोल मॅनेजर – जागा 1
पात्रता: ISO ची माहिती असणे आवश्यक किमान 4 ते 5 वर्ष अनुभव
मॅकेनिकल व इलेक्ट्रोनिक्स इंजीनिअर्स – जागा 2
किमान 3 ते 4 वर्षाच्या अनुभव
सीनियर/ज्युनियर अर्कीटेट (M/F)– जागा 2,
टेली-९ चे संपूर्ण ज्ञान तसेच जीएसटी व टॅक्सेशनचे संपूर्ण ज्ञान आवश्यक
ऑफिस बॉय कोर्डिनेटर – जागा 2
ग्रॅज्युएट, ऑफिस व बाहेरचे (बँक) कामाचा अनुभव, इ-व्हीलर आवश्यक
ऑफिस बॉय – जागा 2
ऑफिस मध्ये कामासाठी, अनुभव असल्यास नसल्यास संपर्क करा
ड्रायव्हर – जागा 2, निर्व्यसनी व अनुभवी
वॉचमन – जागा 2, अनुभवींना प्राधान्य
इच्छुकांनी संपूर्ण माहिती व कागदपत्रासह दि. २४ रविवार ते ३० मंगळवार पर्यंत दु. ३ ते ५ या वेळेत समक्ष भेटावे, आकर्षक पगार दिले जाईल
डिजीटल प्रिंट्स प्लॉट नं. W-36/C/1, MIDC, अहमदनगर संपर्क –8329032119

REQUIRED FEMALES TELECALLERS FOR BANKING PROCESS -10.
- EDUCATION - 12 TH TO GRADUATION.
SALARY - 8 K TO 10 K.
ZOPDI CANTIN ,SAVEDI, AHMEDNAGAR.
9168218622, 8149884437

पाहिजेत
नगर शहरात फ्लिपकार्टमध्ये डिलेव्हरी बॉय पाहिजे. जॉब करण्याची सुवर्णसंधी, ५ ते ६ तास काम, कमवा १५ ते २२ हजार रु.
अर्जुन सानप
7391990045
8208056858

मुले पाहिजेत
कॉफी शॉपवर कामासाठी मुले पाहिजेत २
इच्छुकांनी प्रत्यक्ष येऊन भेटावे
कपिश कॅट कॉफी
प्रोफेसर कॉलनी चौक, सावेडी अ.नगर
मो.-8805309777, 7020553064

राखी दुकानात कामासाठी मुले/मुली पाहिजे
परदेशी बंधू रक्षाबंधन
घासगल्ली, अ.नगर
9890913382

श्री तिलोकरत्न स्थानकवासी जैन धार्मिक परिक्षा बोर्ड
श्री तिलोक आनंद मानवसेवा केंद्र
(स्व.बसंताबाई शिवलालजी गांधी चिकित्सालय)
त्वरीत पाहिजे
- लॅब टेक्निशियन – जागा ४
शैक्षणिक पात्रता – डी.एम.एल.टी.
- एक्स–रे टेक्निशियन – जागा २
अनुभवी उमेदवारांनी ७ दिवसाच्या आत अर्जासह सकाळी ११ ते ५ वेळेत समक्ष भेटावे.
श्री तिलोकरत्न स्थानकवासी जैन धार्मिक परिक्षा बोर्ड
कार्यालय : भक्तनिवास, धार्मिक परिक्षा बोर्ड, अहमदनगर.

श्री बडीसाजन ओसवाल श्री संघ
आनंदऋषीजी हॉस्पिटल शेणारी, माणिकनगर, अ.नगर
फोन नं. 0241-2358574 / 9890071234
विकणे आहे
१) वॉटर कुलर
२) सीलींग पंखे, इलेक्ट्रिक फिटिंग, इलेक्ट्रिक गिजर ३ नग
३) फर्निचर – ३ डबल बेड व ३ वार्डरोब (कपाट), २ X ३ सिटींग सागवानी सोफा, ड्रेसिंग टेबल ३८ नग अंदाजे, सागवानी फोल्डिंग दरवाजे १० नग अंदाजे, फ्लश डोर, लाकडी टेबल
४) जेवणाचे लोखंडी टेबल ५० नग अंदाजे (६ X १.६)
आनंद मुद्रिणंदी
व्यवस्थापक
श्री बडीसाजन ओसवाल श्री संघ

काबरा एक्सप्रेस
डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्विस
फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद, नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश इंदौर (राज महौल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र मुंबई (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक, पुणे
राजस्थान उदयपुर, अजमेर, जयपुर दिल्ली मोरी गेट
साऊथ बंगलोर, हैदराबाद, गोवा
For Details Scan
अहमदनगर नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड
7972872112
EYE Q MEDIA

"अटूट विश्वास, अच्छे लकडी का वादा"
फर्निचर साठी लागणारे सर्व प्रकारचे लाकूड व मोल्डिंग पट्टी
प्रेश पित्रोडा
गुलमोहर रोड 98 23 70 4000

डॉ. मनिषा शिरसाट
MBBS. DA,
ICU Specialist &
Anaesthesiologists
Lotus Healing
Palliative & Nursing Care
लोटस हीलिंग
पॅलिएटिव्ह आणि नर्सिंग केअर
कॅन्सर, अर्धांगवायू, मेंदूला मार लागल्यामुळे अंथरुणाशी खिळलेले रुग्ण, एकाच जागेवर झोपून झालेले बेड सोर, हृदयाचे आजार, श्वसनाचे आजार, डिमेन्शिया अल्झायमर असा रुग्णाना होणारा त्रास कमी करण्यासाठी, कुटुंबिय आणि रुग्ण यांचे जीवनमान सुधारणे, रुग्णांची शारीरिक, मानसिक, सामाजिक व अध्यात्मिक गरज पूर्ण करणे, रुग्णाचे आयुष्य आरामाने व आदराने जगण्यासाठी
सर्व प्रकारच्या परावलंबी आणि वयोवृद्ध रुग्णांसाठी हक्काच घर !!!
२४ तास सेवा | योग्य दरात सेवा | अनुभवी स्टाफ | तज्ञ डॉक्टर | योग्य वर्ग | आहार मार्गदर्शन
3D कॉर्नर, शिवाजी नगर, तपोवन मंदिराजवळ, तपोवन रोड, अहमदनगर
Phone - 8983134779

फक्त 15 मिनिटात सोने तारण कर्ज 9% व्याजदर
शुन्य टक्के प्रोसेसिंग फी
प्रति तोळा ₹54000
लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या.
अधिक माहितीसाठी संपर्क :
7888219471, 9423167850
बागडपट्टी, अहमदनगर

सुवर्णखरेदी फायद्याची मोठी संधी **बचतीची**
22 कॅरेट सोन्याचा भावही कमी आणि मजुरीही कमी !
कुंदन, टेम्पल, कलकत्ती व स्टोन सेटींगमधील दागिन्यांची
प्रतीग्रॅम मजुरी ₹555/- पासून
आजच चंदुकाका ज्वेल्स, सावेडी येथील या आपल्या खास काऊंटरला भेट द्या.
ऑफर मर्यादित कालावधीसाठी, मर्यादित स्टॉकवर लागू*
*नियम व अटी लागू.
चंदुकाका - ज्वेल्स -
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02

पुण्यस्मरण

प.पू. स्व.श्रीमान नंदलालजी जोशी
स्व.दि. ८८/४/२०१० (कन्नी महाराज अमृतधारा)
स्व. श्रीमती राधिका नंदलाल जोशी
स्व. दि. २३/६/२०१३ (तिर्थी बटोविया)
हरदम रहता है आपका एहसास..
हर दिन आती है आपकी याद..
ऐसे ही रखना..
आपका आशीर्वाद हमारे साथ
* शोकाकुल *
लतिका योगेश कौशिक पुष्पा सतीश मानका
उमा राजीव शर्मा गायत्री नंदलाल जोशी
(आपकी प्यारी बेटियां)

दिप : सुट्टी-सो घ्या सेक्स बघतू शकताल
हिंगांक : 26 जुलै ते 2 ऑगस्ट 2024
डेडपूल अँण्ड वूलवरीन (3D) 7.30 AM, 10.00 AM, 12.40 PM, 3.15 PM 5.50 PM, 8.25 PM, 11.00 PM
रामायण 9.30 AM, 10.00 PM
कल्की 12.30 PM, 6.30 PM
बॅड न्युज 9.00 AM, 2.15 PM 7.45 PM, 10.45 PM
गूलाल आई (मराठी) 11.45 AM
घरात गणपती (मराठी) 5.00 PM
द अप फाईल्स् (मराठी) 4.00 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow **CONNPLEX** AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

।। मुलगाच्यांनी प्रवास ।।
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर–पुणे–नगर
आता आपल्या शहरातून

वेळापत्रक
■ नगर वेळपत्रक क्र. ७,८,९ व दुपारी ५.०५
■ पुणे वेळपत्रक क्र. ११,१६,१८ सायं.५ पा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस रिरजर्वेशनीकरण
सर्व्हीस ३ सिटस्
विशेषता धोरीट –नियमाचा दौरा, शाळेची सेन्टीन, लग्नाच्या रिझेप्शन, गव्ह पिक्निक सेवा अत्यंत सेवा देणारा
पुणे ट्रॉव्ह– मार्गोनी, वारसी मायाना,वेसवा, नाशिक विमानतळाच्या बसपर्यंत
अमर–प्रेम हॉलिडेज,
सावेडी – नेवासा रोड, अ.नगर
9657746555/ 9226399555

पगडी रस्म
सभी को सुचित करते है कि, विशनदास मनोहरलाल वाधवानी इनका गुरुवार ता. २५/०७/२०२४ को स्वर्गवास हुआ है ।
* पगडी रस्म कार्यक्रम *
रविवार ता. २८/०७/२०२४ को, समय : शाम ५.०० से ५.३० बजे तक, स्थान : कृपाल आश्रम, मिस्किननगर,अ.नगर
स्व.विशनदास मनोहरलाल वाधवानी
फर्म : एम.महेश टेलर्स तारकपूर
– : दुःखांकित : – सुरेश वाधवानी एलआयसी एजंट
समस्त वाधवानी परिवार तथा रिश्तेदार

।। दशक्रिया विधी ।।
माऊली नेली वावरी / कल्पनेचा हरवला पाल्यू ।।
उपली वाही साथ अम्हाला / आठवा येते क्षणाक्षणाला ।।
कळविणात अत्यंत दुःख होते की, आमचे वडिल
कै. किरणराव माधवराव सोनवणे
यांचे रविवार, दि. २१/०७/२०२४ रोजी पहाटे अल्पा आजाराने दुःखद निधन झाले आहे, तरी त्यांचा **दशक्रिया विधी** सोमवार, दि. २९/०७/२०२४ रोजी सकाळी ८:०० वा. **अमरधाम, नालेगाव, अ.नगर** येथे होईल. प्रसादाचा कार्यक्रम सकाळी ९० वा. लक्ष्मीनारायण मंदिर, बायडपूरी येथे होईल.
- शोकाकुल -
मं.भा. सुमना किरणराव सोनवणे
श्री. गजेंद्र किरणराव सोनवणे – श्री. सुरेंद्र किरणराव सोनवणे – श्री. नरेंद्र किरणराव सोनवणे
समस्त अहेकर, खडे, भानोरी, आचारी, पेठ, चौपरी, केकाणे, आहिरराव, तरोवे व सोनवणे परिवार...
* निवास – २६५, पावन चिंचेचा मुरुंबोचा समोर, नालेगाव, अ.नगर.
मो.: ९४२३४२७७१२ / ९४०३९२९५४७ / ९८५०१९९९९७
टिप : कोणताही प्रकारचा दुकडा आणू नये, हि नम्र विनंती ! योगाच्या सेवेताही निरर्गुणी पोपटान संबंधेचा थोडाशे मदत करा.

Earn Diploma in DISHA Pan India
DISHA COMPUTER INSTITUTE
Accounting & Taxation
च्या क्षेत्रात विद्यार्थ्यांची उत्तरोत्तर प्रगती हेच आमचे ध्येय
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
100% JOB ASSISTANCE
Duration : 6 Months
Experienced Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
Delhi Gate Branch: 1st Floor, Anand Kalpana Nagarika, Above Supaker Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 — 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Above Ashok Leyland Lakshmanjan Office, Near Mahavir Stand, Station Road, A.nagar — 9371151769
Pipeline Branch: Office No. 203, Second Floor, Pusha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 — 7447761769